कृषीवल
रायगड, गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५
किंमत ४ ₹

## माजी मंत्री भारत बोंद्रे यांचे निधन

**बुलढाणा :** शरद पवार यांचे खंदे समर्थक व राज्याचे जलपुरुष म्हणून ओळख असलेले भारत भाऊ बोंद्रे यांचं निधन झालं आहे. त्यांनी वयाच्या ८४ व्या वर्षी वृद्धापकाळाने चिखली येथे अखेरचा श्वास घेतला. १९६७ पासून ते शरद पवार यांच्यासोबत होते. शरद पवारांचे एकनिष्ठ साथीदार म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनानंतर सर्वच स्तरातून शोक व्यक्त होताना दिसत आहे. भारत भाऊ बोंद्रे हे १९७२ साली प्रथम चिखली विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले होते. त्यानंतर सलग चार वेळा त्यांनी चिखली विधानसभेचे प्रतिनिधित्व केलं होतं. राज्याच्या मंत्रिमंडळातही त्यांनी पाटबंधारे मंत्री, पान २ वर

## ‘ईव्हीएममध्ये घोळ होणार’

**सातारा :** नगरपालिकांच्या निवडणूक कार्यक्रमात त्रुटी उघड झाल्याने निवडणूक आयोगावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत, असा आरोप शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी केला. निकालाची तारीख ऐनवेळी बदलून २० दिवसांचा गॅप ठेवण्यात आला, त्यामुळे ईव्हीएममध्ये घोळ होणार अशी लोकांमध्ये चर्चा असल्याचंही ते म्हणाले. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यावेळीच मी सांगितले होते की एकही त्रुटी न्यायालयात प्रलंबित राहिली तर निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पुढे ढकलली जाईल आणि तसेच घडले, असे त्यांनी स्पष्ट केले. पान २ वर

## वेधक

### ४४ लाखांचा तांदूळ जप्त

**पनवेल :** फोर्टीफाइड तांदळाची खुल्या बाजारात विनापरवाना विक्री करताना आढळल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वेस्टर्न राइस मिल, कोल्हापूर, पिके मलगी अँग्रोटेक लिमिटेड कर्नाटक, श्री बंशाकरी अॅग्रो प्रोसेसिंग लिमिटेड या कंपनीमार्फत सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत असलेल्या फोर्टीफाईड तांदळाची विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. आष्टे लॉजिस्टिक कसळखंड समोरील ट्रक पार्किंगमध्ये पुरवठा विभाग आणि पनवेल तालुका पोलीस यांच्याकडून कारवाई करण्यात आली. यावेळी पाच वाहनांमध्ये ४४ लाख २१ हजार ४१६ रुपयांचा एक हजार ६०० क्विंटल तांदूळ सापडल्या.

### तीन दिवस समुद्रात उंच लाटा

**मुंबई :** हवामान खात्याने महाराष्ट्रात तापमानात मोठी घट होण्याची शक्यता वर्तवली आहे. आता ४ ते ७ डिसेंबर २०२५ दरम्यान सलग तीन दिवस समुद्राला मोठी भरती येणार असल्याचा इशारा दिला आहे. या काळात साडेचार मीटरपेक्षा अधिक उंचीच्या लाटा उसळणार आहे. ४ डिसेंबर रोजी रात्री ११:५२ वाजता ४.९६ मीटर, ५ डिसेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता ४.१४ मीटर उंचीच्या लाटा येणार आहेत. ६ डिसेंबर रोजी मध्यरात्री १२:३९ वाजता सर्वाधिक ५.०३ मीटर आणि दुपारी १२:२० वाजता ४.१७ मीटर भरती असेल. ७ डिसेंबर रोजी मध्यरात्री १:२७ वाजता ५.०१ मीटर आणि दुपारी १:१० वाजता ४.१५ मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत.

### राजकीय वादातून एकमेकांविरोधात गुन्हे

**महाड :** महाड नगरपरिषद निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेच्या दिवशी शहरातील शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात झालेल्या राड्यानंतर दोन्ही बाजूंनी परस्पराविरोधी तक्रारी दाखल झाल्याचे समोर आले आहे. पहिली तक्रार सुशांत गणेश जाबरे (रा. टोळ) यांनी महाड तालुका पोलीस ठाण्यात दाखल केली. यात विकास भरत गोगावले, महेश गोगावले, विजय मालुसरे, प्रशांत शेलार, धनंजय व वैभव मालुसरे, सूरज मालुसरे (रा. ढालकाठी), सिद्धेश शेठ (रा. पोलादपूर) तसेच आणखी दहा अज्ञात व्यक्तींविरोधात गंभीर आरोप करण्यात आले आहेत. जाबरे यांच्या मते, पान २ वर

## स्ट्राँगरुमच्या सुरक्षेसाठी
# जागता पहारा




**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।** रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी मतदान प्रक्रिया जिल्ह्यात राबविण्यात आली. मतमोजणी तीन डिसेंबरला होणार होती. परंतु, मतमोजणी पुढे ढकलण्यात आली असून २१ डिसेंबरला मतमोजणी सर्व ठिकाणी होणार आहे. त्यामुळे ईव्हीएम मशीनच्या सुरक्षेची जबाबदारी प्रशासनावर पडली आहे. दहा नगरपरिषदेच्या हद्दीत स्ट्राँगरुम तयार करण्यात आले आहेत. या स्ट्राँगरुमच्या सुरक्षेसाठी रायगड पोलीस सज्ज असून २०हून अधिक दिवस पोलिसांचा २४ तास जागता पहारा राहणार आहे.

### आता राजकीय मंडळींचादेखील राहणार पहारा

नगरपरिषदेच्या निवडणुकीचे मतदान सोमवारी झाले.२१ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. पोलिसांच्या बंदोबस्तामध्ये स्ट्राँगरुममध्ये नजर राहणार आहे. पोलिसांच्या बरोबरच शासनाने राजकीय प्रतिनिधींसाठीदेखील स्वतंत्र कक्ष सुरू करण्याची सूचना दिली आहे. त्यामुळे राजकीय मंडळीदेखील स्ट्राँगरुमच्या ठिकाणी पहारा देऊन राहणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना सुरक्षा आणि गोडावूनबाबत अवगत केले जाणार आहे. गोडावून सुरक्षेबाबत त्यांना पाहणी करता येणार आहे. मतदान यंत्र साठवणुकीच्या गोडावूनचेद्वार दिसेल, अशा ठिकाणी निवडणूक लढविणारे उमेदवार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधींना बसण्याची जागा निश्चित केली आहे.

अलिबाग, पेण, कर्जत, उरण, माथेरान, महाड, श्रीवर्धन, रोहा, मुरूड, खोपोली या दहा नगरपरिषदांच्या निवडणूकीचे मतदान २ डिसेंबरला झाले. ७० टक्केहून अधिक मतदान झाले. दोन लाख ३७ हजार ५०३ मतदारांपैकी एक लाख ६६ हजार ८५७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. परंतु मतमोजणी लांबणीवर गेल्याने ईव्हीएम मशीन सुरक्षीत ठेवण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी व जिल्हा प्रशासन कामाला लागले आहे.

अलिबागमधील जनरल अरुणकुमार वैद्य हायस्कूलच्या परिसरात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आले आहे. या कक्षामध्ये स्ट्राँगरुम तयार करण्यात आले आहे. स्ट्राँगरुममध्ये ईव्हीएम मशीन सील बंद करून ठेवण्यात आल्या आहेत. अन्य नगरपरिषदेच्या हद्दीतदेखील स्ट्राँगरुम तयार करण्यात आले आहेत. या स्ट्राँगरुममध्ये सुरक्षेच्या दृष्टीनेदेखील दक्षता घेण्यात आली आहे. १५ पोलीस कर्मचारी या ठिकाणी नेमण्यात आले असून त्यात अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. पोलिसांची पान २ वर

### नगरपालिका स्ट्राँग रुम

**अलिबाग :** जनरल अरुण कुमार वैद्य हायस्कुल
**पेण :** लिटल एजल स्कुल
**खोपोली :** सेंट मेंरीज हायस्कुल
**मुरुड :** दरबार हॉल, तहसिल कार्यालय
**रोहा :** जेष्ठ नागरिक सभा मंडप
**कर्जत :** नगरपरिषद कार्यालय
**श्रीवर्धन :** तहसिल कार्यालय
**महाड :** नगरपरिषद कार्यालय
**उरण :** नगरपरिषद कार्यालय
**माथेरान :** उपकोषागर कार्यालय



“स्ट्राँग रुमच्या सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलण्यात आली आहे. स्ट्राँग रुमच्या परिसरासह रुमच्या बाजूला पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शस्त्रधारी पोलीस याठिकाणी असणार आहेत. सुरक्षा अधिक मजबूत ठेवण्यात आली आहे.”

–सचिन हिरे, पोलीस निरीक्षक, खोपोली

निवडणुकीचा निकाल बहुदा मतदानाच्या दुसऱ्या दिवशी ऐकायला मिळतो. तशी तयारी निवडणणुक यंत्रणा आणि राजकारण्यांकडून करण्यात येते. यावर्षी न्यायालयाच्या कचाट्यात निवडणूक सापडल्याने काही नगरपालिकांची निवडणूक आरक्षणाच्या मुद्द्यावर पुढे ढकलण्यात आली. याचा फटका नगरपालिका निवडणुकीच्या निकालाला बसला. यामुळे राजकीय कार्यकर्ते आणि पुढारी नाराज असल्याचे चित्र आहे.

## भूमिगत गटाराचा प्रश्न मार्गी लागणार
### प्रशांत नाईक यांनी केली कामाची पाहणी


(छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
अलिबाग शहरातील भूमिगत गटाराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी पुढाकार घेतला आहे. या प्रकल्पाच्या कामाची पाहणी बुधवारी (दि.३) प्रशांत नाईक यांनी केली. आता थांबायचे नाही, असा निर्धार करीत त्यांनी शहरातील विकासकामांना सुरुवात केली आहे. प्रकल्पाच्या कामाची गुणवत्ता, कामाची गती अशी सर्वच माहिती घेऊन हे काम विनाविलंब करण्यात यावे, अशी सूचना संबंधित कंपनीच्या ठेकेदाराला व अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

अलिबाग शहर पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे पान २ वर

### पहिल्या टप्प्यात २५ किलोमीटरचे गटार

पहिल्या टप्प्यात २५ किलोमीटर तर दुसऱ्या टप्प्यात १७ किलो मीटरचे गटार असणार आहे. या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली असून प्रकल्पाच्या कामासाठी पहिला १ कोटी ८० लाख रुपये व व दुसरा हप्ता २ कोटी ७० लाख रुपये प्राप्त झाला असल्याची माहिती देण्यात आली.

## हरवंडीत घराला आग; लाखोंचे नुकसान

**। माणगाव । वार्ताहर ।**
हरवंडी गावातील परशुराम मानकर यांच्या घराला मंगळवारी (दि.२) सायंकाळच्या सुमारास अचानक आग लागून मोठे नुकसान झाले. या भीषण आगीत घरातील साहित्य जळून खाक झाले असून लाखोंचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर आले आहे. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग लागल्याची माहिती मिळताच हरवंडी ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. यामध्ये ग्राम ीण वस्ती सेवा एस.टी. कर्मचारी अशोक आगाव आणि संभाजी कोंडे यांनी धाडसाने पुढाकार घेऊन आग विझविण्यात मोलाचे योगदान दिले. पान २ वर

## मुरुडमध्ये दिलीप भोईरांना पोलिसांनी रोखले?

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
मुरूड नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने मंगळवारी मतदान प्रक्रिया सुरू होती. त्यावेळी शिंदे गटातील दिलीप भोईर यांनी गैरमार्गाने मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. मात्र तेथील स्थानिकांनी रोखल्याने हा प्रकार वेळीच आवरला गेला. मुरूड पोलिसांनीदेखील त्यांना रोखले असल्याची माहिती समोर येत आहे.

दिलीप भोईर यांना अलिबागमधील जिल्हा न्यायालयाने मारहाण, जीवेठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी शिक्षा सुनावली होती. त्यांची कारागृहात रवानगीदेखील झाली होती. मुंबई उच्च न्यायालयात त्यांनी जामीनासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने अटीशर्तीवर त्यांचा काही दिवसांपूर्वी जामीन मंजूर केला. रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषदेच्या निवडणुकीचे मतदान मंगळवारी सकाळपासून सुरू होते. मुरूडमध्येदेखील मतदानाचा उत्साह कायम दिसून आला. मात्र शिंदे गटातील दिलीप भोईर यांनी मुरूडमध्ये मतदारांना आकर्षित करण्यासाठी काही गैरप्रकार केल्याची चर्चा सध्या मुरूडमध्ये सुरू आहे. त्यावेळी काही सुज्ञ नागरिकांनी त्यांना रोखले. ही बाब मुरूड पोलिसांच्या निदर्शनास आणून दिली. मुरूड पोलिसांनी दिलीप भोईर यांना रोखून तंबी भरली. त्यानंतर हे प्रकरण शांत झाले असल्याची चर्चा आहे.

## कारमध्ये सापडले पिस्तूल



**। पनवेल । प्रतिनिधी ।**
पनवेल शहर वाहतूक शाखेच्या सतर्कतेमुळे एका अनधिकृत पार्किंग केलेल्या फॉर्च्युनर कारमध्ये पिस्तुल तसेच संशयित व्यक्तीची ड्रायव्हिंग लायसन्स सापडली. मतदानाच्या दिवशीच ही घटना घडल्याने विविध चर्चांना उधाण आले. या प्रकरणी डुप्लिकेट नंबर वापरणाऱ्या संशयित चालकाला ताब्यात घेऊन पुढील चौकशीसाठी खांदेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

चार चाकी फॉर्च्युनर कारमध्ये वाहतूक पोलिसांना पिस्तूल सारखे शस्त्र सापडून आले. पुढील कायदेशीर कारवाई करण्यासाठी कारचालकाला खांदेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

**घटना कशी उलगडली?**
मंगळवारी (दि.२) सायंकाळी सुमारे पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक उपनिरीक्षक जीवन शेरखाने, पोलीस हवालदार येळे, पोलिस हवालदार मुलाणी आणि पोलिस नाईक निकम हे नवीन पनवेल रेल्वे स्टेशन (पूर्व) परिसरात वाहतूक नियमन करत होते. त्यावेळी स्टेशन परिसरात पार्किंग करण्यात आलेली फॉर्च्युनर ही गाडी वाहतूक व्यवस्थेला अडथळा ठरत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. गाडीवरील नमूद नंबरच्या मालकाला संपर्क साधला असता, सदर वाहन माझे नसून अज्ञात व्यक्ती माझ्या गाडीचा नंबर वापरत आहे. त्याबाबत वेळोवेळी तक्रारी केल्याचेही मालकाने कळवले. संशय आल्याने वाहतूक पोलिसांनी वाहनाची पाहणी केली. पान २ वर

## स्व.नमिता नाईक यांची जयंती साजरी



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्व. नमिता नाईक यांची अलिबागमध्ये जयंती साजरी करण्यात आली. शेतकरी भवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख अॅड. मानसी म्हात्रे, शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, तालुका चिटणीस सुरेश घरत, अनिल चोपडा आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्व. नमिता नाईक यांनी महिला सक्षमीकरणावर अधिक भर दिला. शहरातील वेगवेगळे प्रश्न मार्गी लावण्यामध्ये त्यांचा एक वेगळा हातखंडा होता. राजकीय क्षेत्राबरोबर सामाजिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान होते. शहरात वेगवेगळे उपक्रम राबवून महिला, तरुणांना रोजगाराचे साधन खुले करून देण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. स्व.नमिता नाईक यांची तीन डिसेंबरला जयंती अलिबागमध्ये ठिकठिकाणी साजरी करण्यात आली आहे. अलिबागमधील शेतकरी भवनसह वेगवेगळ्या भागात जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या कार्याची माहिती देऊन जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

## उरण, नागाव ग्रामपंचायतीत घोटाळा | किरण केणी यांना हलगर्जीपणा भोवला
# ‘आदर्श ग्रामसेवका’चे निलंबन

**। उरण । प्रतिनिधी ।**
उरण तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे अड्डे उघडपणे फोफावत असतानाच नागाव ग्रामपंचायतीतील सर्वात मोठा घोटाळा समोर आला आहे. अनेक महिन्यांपासून ग्रामस्थांनी लेखी तक्रारी, पुरावे आणि वारंवार पाठपुरावा करूनही उरण पंचायत समितीकडून या प्रकरणाच्या चौकशीला मुद्दाम टाळाटाळ करण्यात येत होती. अखेर जिल्हा परिषदेने आदर्श ग्रामसेवक म्हणून गौरविलेले नागाव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक किरण केणी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ही माहिती पं.समितीचे गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

नागाव ही उरण तालुक्यातील सर्वात मोठी आणि महत्त्वाची ग्रामपंचायत मानली जाते. मात्र याच गावात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार, फाईलींची अदलाबदल, खोटे दाखले, मंजुरीचे व्यवहार आणि निधीचा अनियमित वापर झाल्याच्या गंभीर तक्रारी ग्रामस्थांनी गेल्या अनेक महिन्यांपासून पंचायत समितीकडे दाखल केल्या होत्या. पण तक्रारींना गांभीर्याने न घेता, चौकशी न करता, अर्ज काही दिवसांनी निकाली काढले असा शिक्का मारण्याचा उद्योग उरण पंचायत समितीत सुरू असल्याची चर्चा तालुक्याभर रंगू लागली होती. त्यामुळे उरणमध्ये पंचायत समितीतील अधिकारीच भ्रष्टाचार करणाऱ्यांची ढाल बनले आहेत का, असा सरळ प्रश्न स्थानिक पातळीवर विचारला जाऊ लागला.

- **अधिकारीच बनले भ्रष्टाचार करणाऱ्यांची ढाल**
- **ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष**

### ग्रामसेवकांच्या कारभारावर लक्ष ठेवा

या सर्व घडामोडींनंतर उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच नगरविकास मंत्र्याकडे ठोस मागणी केली आहे की, आदर्श ग्रामसेवक पुरस्कार मिळवलेल्या कर्मचाऱ्यांच्या कारभाराची पुन्हा एकदा सखोल चौकशी करावी. ज्यांनी भ्रष्टाचार केला आहे किंवा ज्यांच्याविरुद्ध गंभीर अनियमितता आढळेल, त्यांचे पुरस्कार तातडीने रद्द करण्यात यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

तक्रारदारांना न्याय मिळत नसल्याने अखेर ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्याकडे धाव घेतली. सातत्याने पाठपुरावा करत अखेर त्यांनी नागाव ग्रामपंचायतीची सखोल चौकशी सुरू केली आणि या तपासात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट निष्कर्ष समोर आले. या निष्कर्षावरून ग्रामसेवक किरण केणी यांच्यावर भ्रष्टाचाराचा ठपका ठेवत त्यांचे निलंबन करण्यात आल्याची माहिती अधिकृतरित्या देण्यात आली.सर्वात धक्कादायक बाब म्हणजे ज्याच्यावर पान २ वर

## ‘महापरिनिर्वाणदिनी हवी टोलमाफी’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी ६ डिसेंबरला देशभरातील लाखो अनुयायी मुंबईतील दादर येथील चैत्यभूमीला भेट देऊन बाबासाहेबांना अभिवादन करतात. चैत्यभूमीला येणाऱ्यांमध्ये लाखो अनुयायी बाहेरून वाहनाने मुंबईत येतात. या अनुयायांच्या वाहनांचा टोलमाफ करावा, अशी मागणी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा एकनाथ गायकवाड यांनी केली आहे.

खा. वर्षा गायकवाड यांनी दिल्लीत केंद्रीय सडक परिवहन व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन टोलमाफीचे निवेदन दिले. पान २ वर

## कोकणातील आंगणेवाडी जत्रेची तारीख ठरली

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**
महाराष्ट्रात आंगणेवाडीच्या भराडीदेवीच्या जत्रेचे वैशिष्ठ म्हणजे दरवर्षी देवीला कौल लावून या यात्रेची तारीख ठरवली जाते. त्यामुळे यंदा ही यात्रा कोणत्या तारखेला येणार? याकडे अनेकांचे लक्ष लागले होते. अखेर आज (०३ डिसेंबर) सकाळीच भराडी देवीने कौल दिल्यानंतर आंगणेवाडी ग्रामस्थ मंडळाने जत्रेची तारीख निश्चित केली आहे. त्यानुसार आंगणेवाडीच्या जत्रेला पुढील वर्षी ९ फेब्रुवारीला सुरुवात होणार आहे.


आंगणेवाडीच्या जत्रेची तारीख कुठच्या तिथी अथवा वारानुसार ठरलेली नाही. तर देवीचा कौल घेऊन जत्रेची तारीख ठरवली जाते. यात्रा दीड ते दोन दिवस चालते. पण या जत्रेची लगबग देवदिवाळीपासून सुरू होते. देवदिवाळीच्या पान २ वर

### अशी आहे परंपरा

मसुरे गाव येथील भराडावर म्हणजेच माळरानावर देवी साक्षात प्रकट झाल्याचे मानले जाते. त्यामुळे या देवीला भराडी देवी हे नाव पडलेले आहे. कोकणातील भाविकांची देवीवर श्रद्धा आहे, आंगणे कुटुंबियांचे मंदिर असले तरी ते आता संपूर्ण कोकणाचे झाले आहे. भाविक येथे नवस बोलतात, तो पूर्ण होत असल्याची त्यांची श्रद्धा आहे. त्यामुळे आंगणेवाडीची यात्रा आता कोकणवासीयांची जत्रा झाली आहे.

# नागोठण्यात चोरीच्या घटनांत वाढ

**|| सलग दुसऱ्या दिवशी दोन ठिकाणी घरफोडी || चोरट्यांना पकडण्याचे पोलिसांसमोर आव्हान**




**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यातील मोहल्ला भागात असलेल्या दोन वेगवेगळ्या इमारतीमधील बंद असलेले एकूण पाच फ्लॅट फोडून लाखो रुपयाचा ऐवज व रोख रक्कम लंपास केल्याची घटना ताजी असतानाच मंगळवारी (दि.२) रात्री नागोठण्यातील रमाई नगर येथील बंद असलेल्या दोन घरातून अज्ञात चोरट्यांनी सुमारे १५ ते २० लाख रुपयांचे दागिने व रोकड लंपास केले. नागोठण्यात लागोपाठ दोन दिवसात घडलेल्या या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून चोरट्यांनी पोलिसांसमोर आव्हान उभे केले आहे.

मंगळवारी घडलेल्या चोरीच्या दुसऱ्या घटनेत नागोठण्यातील रमाई नगर येथील कौटुंबिक कारणास्तव मुंबई येथे गेलेल्या विजय शिर्के व जिंदाल कंपनीत रात्रपाळीला गेलेल्या सचिन गायकवाड यांच्या बंद असलेल्या घरांना चोरांनी लक्ष करून सोन्याच्या दागिन्यांचा लाखो रुपयांचा ऐवज व रोकड लंपास केली आहे.

या संदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, नागोठणे रमाई नगरमधील रहिवासी विजय धर्मा शिर्के हे लग्न कार्यानिमित्त मुंबई येथे सहकुटुंब गेले होते. त्यामुळे त्यांचे घर बंद होते. त्याचाच फायदा घेत चोरट्यांनी कुलूप तोडून घरातील ३ सोन्याची चैन, ५ सोन्याच्या अंगठ्या, लहान मुलांचे ४ सोन्याचे लॉकेट, अर्धा किलो चांदी व १६ हजार रुपयाची रोख रक्कम चोरुन नेली. तसेच सचिन गायकवाड हे कामाला गेले होते. त्यामुळे त्यांची पत्नी आपल्या लहान बाळासह रमाई नगरमध्येच राहत असलेले त्यांचे दीर संतोष गायकवाड यांच्या घरी गेल्या होत्या. त्यामुळे गायकवाड यांचे घर बंद असल्याने चोरट्यांनी कुलूप तोडून त्यांच्या घरात असलेले साडेतीन तोळ्याचे सोन्याचे गंठण, १ सोन्याचा हार, २ सोन्याची चैन, गंठणचे सोन्याचे पान, सोन्याची बोरमाळा, सोन्याच्या माळ्यांची माळ, सोन्याच्या ४ अंगठ्या, सोन्याचे कानातील ४ छोटे जोड, सोन्याचे कानातील ४ मोठे जोड, सोन्याचे मोठे पान, चांदी १ किलो, ५० हजार रुपये रोख रक्कम असा लाखो रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला.

नागोठण्यातील चोरीच्या या दोन्ही घटनांचा तपास करण्याचे काम पोलीस यंत्रणेकडून सुरू करण्यात आले असून डॉग स्कॉडला पाचारण करण्यात आले आहे. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी घटनास्थळी जाऊन सखोल तपासणी केली. तसेच याप्रकरणी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ते स्वतः तपास करीत आहेत.

## चिरनेरमध्ये भरली दत्त नामाची शाळा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे दत्त जयंती जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त, बुधवारी भिक्षा फेरी, दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगाने कातळपाडा गावातील महिला भगिनींनी जागोजागी रांगोळ्यांच्या पायघड्या घातल्या होत्या. श्री दत्त मंदिरात दत्तगुरूंच्या प्रतिमेचे पूजन करून, दिंडी सोहळ्यास प्रारंभ झाला. अध्यात्मिक पौर्णिमा मंडळाच्या वारकऱ्यांनी आणि कातळपाडा ग्रामस्थांनी दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा या दत्तगुरूंच्या नामाचा टाळ मृदुंगांच्या साथीत गजर केला. त्यामुळे संपूर्ण कातळपाडा परिसरातील वातावरण हे दत्तमय झाले होते. प्रत्येकाच्या मुखातून, श्री दत्तगुरूंच्या नामाचा जयघोष ऐकू येत होता.

## नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा १३ डिसेंबरला

**जिल्ह्यात १५ केंद्रांवर ३ हजार २२४ विद्यार्थी बसणार**




**। रायगड । प्रतिनिधी ।**

जवाहर नवोदय विद्यालय, पीएमश्री स्कूल, निजामपूर येथील इयत्ता सहावीकरिता प्रवेश परीक्षा शनिवार, १३ डिसेंबर २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील एकूण १५ तालुक्यातील परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे.

या परीक्षेसाठी ३ हजार २२४ विद्यार्थी बसणार असून ८० जागांसाठी निवड प्रक्रिया होणार आहे, अशी माहिती विद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत राघमवार यांनी दिली.

परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांची नावे, रजिस्ट्रेशन क्रमांक तसेच ओळखपत्रे ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आली आहेत. उमेदवारांनी https://cbseitms.rcil.gov.in/nvs/AdminCard/AdminCard आणि https://navodaya.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरील प्रवेशपत्र डाउनलोड करावेत. विद्यार्थी रजिस्ट्रेशन क्रमांक आणि जन्मतारीख हीच ओळखपत्र डाउनलोड करण्यासाठी आवश्यक पासवर्ड माहिती असेल, असेही प्राचार्यांनी सांगितले आहे.

सर्व विद्यार्थ्यांनी १३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता नियोजित परीक्षा केंद्रावर वेळेपूर्वी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. परीक्षेबाबत कोणतीही अतिरिक्त माहिती हवी असल्यास संतोष चिंचकर (९८८१३५१६०१) किंवा अर्जुन गायकवाड (९८६२७९३६४०) यांच्याशी संपर्क साधावा.

## उरण पंचायत समितीच्या कार्यालयात दारुच्या बाटल्या



**। उरण । वार्ताहर ।**

उरण पंचायत समितीच्या कार्यालयातून तालुक्यातील ग्रामीण भागातील गावांचा सर्वांगीण विकास साधण्याचे काम केले जाते. मात्र अशा शासकीय कार्यालयाच्या आवारात सध्या दारुच्या बाटल्या आढळून येत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. याप्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत येत असलेल्या उरण पंचायत समितीच्या कार्यालयातून उरण तालुक्यातील ३३ ग्रामपंचायत हद्दीतील गावांचा सर्वांगीण विकास साधण्याचे काम शासकीय अधिकारी वर्गांच्या देखरेखीखाली केले जाते. मात्र अशा शासकीय कार्यालयाच्या आवारात सध्या दारुच्या बाटल्या आढळून येत आहेत. त्यामुळे याठिकाणी दारुच्या बाटल्या येतात कशा?, कोण-कोण दारुच्या पार्ट्यांमध्ये रंगून जात आहे, याबाबत संबंधित कार्यालयातील अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

## राजभवन झाले लोकभवन

**मुंबई :** केंद्र सरकारच्या पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलल्यानंतर आता महाराष्ट्रातील राजभवनचे नावही बदलण्यात आलं आहे. राज्याचे राजभवन आता लोकभवन या नवीन नावाने ओळखलं जाणार आहे. राजभवनच्या सचिवांच्या नावाने एक अधिसूचना जारी करण्यात आली असून त्यामध्ये राजभवनचे नाव लोकभवन असे करण्यात आल्याचा आदेश आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल या ठिकाणी वास्तव्य करतात. राज्यातील राज्यापालांच्या आदेशाने आणि केंद्रीय गृहमंत्रालयाशी चर्चा केल्यानंतर राजभवनचे नाव बदलण्यात आलं आहे. यापुढे राजभवन हे लोकभवन या नवीन नावाने ओळखलं जाईल, असं या आदेशात म्हटलं आहे. या बदलांची सुरुवात २०१६ मध्ये झाली होती. जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या निवासस्थानाचे नाव ७ रेस कोर्स रोडवरून बदलून ७ लोककल्याण मार्ग असे ठेवले होते.

## सुधागड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**वाघोशीचा हर्ष अन पालीचा सारंग प्रथम**



**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

शिक्षण विभाग पंचायत समिती सुधागडे आयोजित ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण समारंभ दिमाखात पार पडला.

विद्यार्थी प्रतिकृतीमध्ये प्राथमिक गटात माध्यमिक विद्यालय वाघोशीचा हर्ष जाधव तर माध्यमिक गटात ग. बा. वडेर हायस्कूल पालीचा सारंग ठाकूर यांनी प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात नाव नोंदविले.

या प्रदर्शनात तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी तब्बल ५२ कल्पक प्रतिकृती सादर केल्या. पर्यावरण संवर्धन, डिजिटल नवोपक्रम, ऊर्जा निर्मिती, आरोग्य संरक्षण, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयोगशील सादरीकरणाला सर्वत्र कौतुक मिळाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून राज्यस्तरीय समन्वयक विश्वास कोरडे, ज्योत्स्ना देसाई, हर्षा चांदोरकर, तृप्ती मराठे, विस्तार अधिकारी नवनाथ साबळे, विक्रम काटकर, मंदार सिनकर, विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब घोडके आदी उपस्थित होते.

५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, आधुनिक तंत्रज्ञानाचे आकलन आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने योगदान देण्याची प्रेरणा निर्माण करण्यात यशस्वी ठरेल अशी ग्वाही गणित अध्यापक मंडळ पाळीचे अध्यक्ष मंदार सिनकर यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल चव्हाण आणि अजित जगताप यांनी केले.

## ओएनजीसी उरण प्लांटच्या वतीने रक्तदान शिबीर

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण येथील ओएनजीसी उरण प्लांटच्या वतीने बुधवारी (दि. १०) ओएनजीसी द्रोणागिरी भवन उरण येथे सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आयोजक ओएनजीसी स्थानिक लोकाधिकार समिती, ओएनजीसी कर्मचारी संघटना आहे. ओएनजीसी स्थानिय लोकाधिकार समिती, ओएनजीसी कर्मचारी संघटनेने आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरात मुंबई व नवी मुंबई रक्तपेढीचे विशेष सहकार्य लाभणार आहे. शिबिरास उमेशा सोंदकूर (मुख्य महाव्यवस्थापक सयंत्र व्यवस्थापक उरण), संजीव कुमार मोहन (मुख्य महाव्यवस्थापक (उत्पादन) आधारभूत सेवा, मनिष मेहता (महाव्यवस्थापक वित्त आणि लेखा विभाग), भावना आठवले (महाव्यवस्थापक प्रभारी मानव संसाधन) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओएनजीसी उरण प्लांटचे अनिल देसाई, पराग कदम, संदिप गावडे, प्रदिप मयेकर, उज्जेश तुपे, बाळकृष्ण काशिद, दिलीप आरदाळकर, नितीन गवळी यांचे सहकार्य लाभणार आहे.

### नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिलानी यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - किरवली, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.न | हिन | क्षेत्र चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| भाग्यश्री प्रभाकर शेळके | ३६ | ७ | एकूण क्षेत्रफळ ७६.८० चौ.मी पैकी (रेल्वे संपादीत १९.७७ चौ.मी वगळून ) ५४.०० चौ.मी विक्री क्षेत्र | ५७० |

सदरहू वर नमूद केलेली बिनशेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर बिनशेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे तरी सदर बिनशेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. ३/१२/२०२५

सही
**ॲड सतीश अर्जुन शेळके**
(बी. ए. एल. एल. बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता-नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत - रायगड मो. न. ९८८११३२२४८

पान १ वरून

## जागता पहारा

१२-१२ तासाची ड्युटी असणार आहे. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचीदेखील या स्ट्राँगरुमला रोज भेट दिली जाणार आहे. पोलीस बंदोबस्तासह सीसीटीव्ही कॅमेरेदेखील या रुमसह परिसरात लावण्यात आले आहेत. मुरूडमध्ये तहसीलदार कार्यालयात स्टाँगरुममध्ये आणण्यात आले. तद्नंतर स्ट्रॉंग रुम सील बंद करण्यात आले असुन आता या ठिकाणी व परिसरात २४ तास सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर असणार आहे. पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोलीस बंदुकधारी, १० एस.आर.पी पोलीस, ८ जिल्हा पोलीस व दोन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. महाड नगरपरिषदेच्या दुसऱ्या मजल्यावर स्ट्राँगरुम आहे. सुरक्षेच्या दृष्टीने आठ कर्मचारी व दोन अधिकारी शस्त्रधारी असणार आहेत. श्रीवर्धन तहसील कार्यालयातील प्रशासकीय भवन येथे स्ट्राँग उभारण्यात आले आहेत. याठिकाणी २० पोलीस कर्मचारी नेमले आहेत. त्यात अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. पेणमध्ये केईएस हायस्कूलमधील परिसरात स्वतंत्र जागेत स्ट्राँगरुम तयार करण्यात आले आहे. या ठिकाणी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियमित नेमणूक केली आहे. खोपोलीमध्ये लवजी येथे सेंटमेरी स्कूलच्या परिसरात स्ट्राँग रुम तयार केले आहे. या ठिकाणी मशीन ठेवल्या आहेत. सुरक्षेच्यादृष्टीने अंतर्गत व बाह्य कक्षात पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला आहे. माथेरान, उरण, कर्जत, रोहामध्येदेखील स्ट्राँग रुमची निर्मिती करण्यात आली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांकडून कडक बंदोबस्त ठेवला जाणार आहे. पोलीस अधिकाऱ्यांसह महसूल, नगरपरिषद विभागाचे अधिकारी या ठिकाणी नेहमी भेटी देणार आहेत. सुरक्षेची पाहणी करणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांच्या हद्दीतील मतपेट्यांसह मशीनच्या सुरक्षेसाठी रायगड पोलिसांचा जागता पहारा राहणार आहे. अठरा दिवस हा पहारा द्यावा लागणार आहे. त्यासाठी रायगड पोलीस तयार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## कारमध्ये सापडले पिस्तूल

यावेळी कारचा दरवाजा अर्धवट उघडा होता. दरवाजा उघडून पाहणी केली असता आत पिस्तूलसारखे शस्त्र आढळून आले. तसेच गाडीमध्ये ड्रायव्हिंग लायसन्स राजेंद्र निकम या नावाचे सापडले. कोर्ट चेकर ॲपमध्ये पाहणी केली असता या इसमावर यापूर्वी मुंबई विभागात गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर खांदेश्वर पोलिसांच्या ताब्यात फॉर्च्यूनर कार व चालकाला देण्यात आले.

## 'आदर्श ग्रामसेवका'चे निलंबन

आता भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध होऊन निलंबन होते, त्या किरण केणी यांना काही दिवसांपूर्वीच जिल्हा परिषदेने आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित केले होते. ग्रामस्थांच्या तक्रारींसह गंभीर आरोप प्रलंबित असताना असा पुरस्कार देण्यात आला कसा, यावरून जिल्हा परिषद प्रशासनावरही संशयाची छाया पडू लागली आहे. आदर्श ग्रामसेवक पुरस्कारही ठराविक व्यक्तींना देण्यासाठीच भ्रष्टाचार झाला का, अशी कानाफुसी आता उरणपासून रायगडपर्यंत सर्रास केली जात आहे.नागावचा घोटाळा आता उरणच्या प्रशासकीय व्यवस्थेतील पोकळपणा उघडा करत आहे. भ्रष्टाचार करणारे आणि त्यांना संरक्षण देणारे यांची साखळी किती खोलवर गेली आहे, हे नागाव प्रकरणाने स्पष्ट केले आहे.

## कोकणातील आंगणेवाडी जत्रेची तारीख ठरली

दुसऱ्या दिवशी डाळप (डाळमांजरी) होते. तिसऱ्या दिवशी प्रमुख आंगणे मानकरी देवळात जमतात. ते मानकरी वंशपरंपरागत असले तरी दरवर्षी चार नवीन मानकरी निवडले जातात. मानकरी पाषाणास तांदूळ लावून उजवा कौल मिळण्याची वाट बघतात. एकदा कौल मिळाला, की यात्रेची तारीख ठरवली जाते.

**धार्मिक महत्त्वासोबतच रंगतो सांस्कृतिक सोहळा**

धार्मिक महत्त्वासोबतच आंगणेवाडीच्या भराडीदेवी यात्रेमध्ये सांस्कृतिक सोहळा देखील रंगतो. आंगणे ग्रामस्थ एक नाटक करतात त्याला मांडावरचं नाटक म्हणतात. मिरजेहून गोंधळी येतात ते देवीसमोर गोंधळ मांडतात. दशावतार असतो. मुंबईतील चाकरमानीही या यात्रेसाठी नित्यनेमाने येत असतात. दरवर्षी सुमारे ७ ते ८ लाख भाविक भराडी देवीच्या दर्शनासाठी केवळ दीड दिवसांच्या जत्रेमध्ये सहभागी होतात.

## 'महापरिनिर्वाणदिनी हवी टोलमाफी'

यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, खा. शिवाजीराव काळगे, खा. रविंद्र चव्हाण व खा.बळवंत वानखेडे उपस्थित होते.यावेळी खा.वर्षा गायकवाड म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणारे अनुयायी सर्वसामान्य समाजातील आहेत. आपल्या महामानवाला अभिवादन करण्यासाठी ते मुंबईत येत असतात. मुंबईत येताना अनेक ठिकाणी टोल भरावा लागतो. हा टोलमाफ केल्यास बाबासाहेबांच्या अनुयायांना एक आर्थिक दिलासा मिळेल. टोलमाफ करून डॉ. बाबासाहेबांच्या अनुयायांच्या भावनांचा व अस्मितेचा सन्मान करावा, असेही खा. वर्षा गायकवाड म्हणाल्या.

## भूमिगत गटाराचा प्रश्न मार्गी लागणार

आहे. लाखो पर्यटक शहरात फिरण्यासाठी येतात. शहरामध्ये नागरिकीकरणदेखील झपाट्याने वाढत आहे. शहरातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक कायमच प्रयत्न करीत असतात. त्याचाच एक भाग म्हणून अलिबाग शहरामध्ये भूमिगत गटार प्रकल्प उभारण्याचा त्यांनी मानस घेतला होता. तो प्रकल्प आता लवकरच मार्गी लागणार आहे. अलिबाग शहरामध्ये नगरोत्थान योजनेअंतर्गत भूमिगत गटार प्रकल्प मंजूर करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी ६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. पावसाळ्यात हे काम करणे शक्य नसल्याने पाऊस संपल्यानंतर प्रशांत नाईक यांनी या प्रकल्पाच्या कामाकडे लक्ष दिले. अलिबाग शहरातील प्रलंबित असलेल्या भूमिगत गटार प्रकल्पाच्या कामाची पाहणी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी बुधवारी केली. कामाच्या गुणवत्तेची माहिती घेत, कामाला गती मिळावी, विलंब होऊ नये अशी सूचना संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना देण्यात आली. भूमिगत गटार प्रकल्प शहरातील स्वच्छता, आरोग्य व तसेच पायाभूत सुविधांसाठी फारच महत्वाचा आहे. त्यादृष्टीने योग्य पध्दतीने काम करण्यात यावे, असे सांगण्यात आले. भूमिगत गटार योजना दोन टप्प्यात असणार आहे.

## हरवंडीत घराला आग; लाखोंचे नुकसान

त्यांच्या तत्परतेमुळे आग मोठ्या प्रमाणात पसरून अधिक हानी होण्यापासून बचाव झाला. दरम्यान, आग लागण्याचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून स्थानिक प्रशासनाकडून पंचनामा करून पुढील तपास सुरू आहे. गावकऱ्यांच्या मदतीमुळे आणि सतर्क नागरिकांच्या प्रयत्नांमुळे मोठी आपत्ती टळल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## 'ईव्हीएममध्ये घोळ होणार'

आम्हाला याची माहिती होते, तर जबाबदार मुख्यमंत्री आणि निवडणूक आयोगाला हे कसे माहिती नसावे? घाईगडबडीत घेतलेल्या निवडणुका हे निवडणूक आयोगाचे फेल्युअर आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

आमदार शशिकांत शिंदे म्हणाले की, मतमोजणीसाठी ठेवलेला २० दिवसांचा गॅप लोकांच्या मनात संशय निर्माण करणारा आहे. लोक खुलेपणाने चर्चा करत आहेत की या काळात मशीनमध्ये काहीतरी घोळ होऊ शकतो. हे सरकार आणि निवडणूक आयोग दोघांचेही फेल्युअर आहे.

ईव्हीएमबाबत लोकांचा विश्वास ढळत असेल तर सरकार या मशीनचा इतका आग्रह का धरत आहे? लोकांच्या मनात शंका निर्माण होत असेल तर येणाऱ्या काळात विनानिवडणुका घेण्यात याव्यात, अशी आमची मागणी आहे असं शशिकांत शिंदे म्हणाले. अतिवृष्टीबाबत केंद्राकडे प्रस्ताव न पाठवल्याने शिंदेंनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. अतिवृष्टीचा प्रस्ताव अजूनही केंद्राला न पाठवल्याने आमदार शिंदे यांनी सरकारला असंवेदनशील ठरवले. ते म्हणाले की, या सरकारला शेतकऱ्यांकडे बघायला वेळ आहे का? कृषिमंत्र्यांच्या खुर्चीवर कोणी टिकत नाही, हा शेतकऱ्यांचा शाप आहे का माहित नाही. शेतकऱ्यांना सहा महिने, वर्षभरानंतर मदत देऊन काही उपयोग नाही.शशिकांत शिंदे म्हणाले की, सरकारमध्येच सर्व ठेकेदार बसले आहेत. साताऱ्यात आमचे उमेदवार सामान्य कार्यकर्ते आहेत. निवडणूक प्रक्रिया आता फक्त फार्स राहिली आहे. प्रशासन सत्ताधाऱ्यांच्या हातातले बाहुले आहे, ते सांगतात एक आणि दुसरेच करतात.

## माजी मंत्री भारत बोंद्रे यांचे निधन

उद्योग मंत्री व शिक्षण मंत्री म्हणून पदे भूषवली होती. पाटबंधारे मंत्री असताना ते बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा प्रकल्प, पेनटाकळी प्रकल्प व जिगाव प्रकल्पाचे ते प्रणेते होते. यासह त्यांनी राज्यातील शेकडो प्रकल्पांना त्यावेळी मंजुरी व गती दिली होती. त्यामुळे त्यांना राज्यात जलपुरुष म्हणूनही ओळखलं जात होतं. त्यांच्या निधनाने बुलढाणा जिल्ह्यातील राजकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

## राजकीय वादातून एकमेकांविरोधात गुन्हे

मतदान प्रक्रियेचा आढावा घेत असताना प्रतिस्पर्धी गटाकडून त्यांच्यावर अचानक हल्ला करण्यात आला. यामध्ये त्यांच्या दोन कार्यकर्त्यांना तसेच अंगरक्षकाला मारहाण झाली. अंगरक्षकाची बंदूक हिसकावून जीव घेण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. याशिवाय दोन वाहनांच्या काचा फोडणे, एका कार्यकर्त्याची सोन्याची चैन आणि चार मोबाईल चोरीला गेल्याचा उल्लेखही फिर्यादीत आहे. तर याउलट दुसरी फिर्याद महेश निवृत्ती गोगावले (वय ३९, रा. पिंपळवाडी) यांनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून सुशांत जाबरे, हनुमंत व श्रीयश जगताप, धनंजय (बंटी) देशमुख, जगदीश पवार, निलेश महाडिक, अमित शिगवण, व्यंकट मंडाला, गोपालसिंग, मंजीतसिंग अरोरा, मोनीश पाल, समीर रेवाळे आणि आणखी दहा जणांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

गोगावले यांनी केलेल्या आरोपांनुसार, प्रतिस्पर्ध्यांनी जमाव तयार करत स्वतःवर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये गोपालसिंग यांनी बंदूक रोखून धम की दिली आणि इतरांनी काठ्या व हॉकीस्टिकने मारहाण केल्याचे नमूद केले आहे. तसेच विजय मालुसरे यांच्या गळ्यातील अडीच तोळ्यांची चैन हिसकावून चोरी केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

दोन्ही तक्रारींवरून पोलिसांनी भारतीय दंड संहिता तसेच शस्त्रास्त्र कायद्याच्या तरतुदीनुसार गुन्हे नोंदवले असून ही घटना एकाच वेळची असल्याने तक्रारी महाड शहर पोलीस ठाण्यात एकत्रित तपासासाठी वर्ग करण्यात आल्या आहेत. पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### जाहीर सूचना

जाहीर सूचना येथे देण्यात येते की, माझे क्लायंट श्री. अनुज गर्ग आणि श्रीमती कृती गर्ग यांनी "इनारा" रिअल इस्टेट प्रकल्प येथे , बी-३०४ हा फ्लॅट, मौजे- तळवडे, तालुका-अलिबाग, जिल्हा रायगड येथे खरेदी केला आहे. सदर फ्लॅट संबंधी त्यांच्यात आणि एरियन डेव्हलपर्स अँड रिअल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात ३०/०५/२०२५ रोजी अलिबाग येथील सब-रजिस्ट्रार कार्यालयात नोंदणीकृत विक्री करारानुसार नोंदणीकृत आहे.

**(नोंदणीकृत क्रमांक २७१९/२०२५)**

त्यांना आढळले आहे की सदर विक्री करारातील काही पाने जसे की पृष्ठ क्रमांक ७१ आणि ७२ हरवली आहेत. सदर प्रकरणाबाबत त्यांनी २९/११/२०२५ रोजी मेट्रो क्राइम ब्रांच दिल्ली येथे एफआयआर दाखल केला. सदर फ्लॅट अलिबाग येथे असल्याने आम्ही जनतेला ही सूचना देत आहोत की जर कोण त्याही व्यक्तीला असलेल्या मूळ नोंदणीकृत कराराची वरील पाने आढळली तर त्यांनी ती आमच्या पत्त्यावर, घर क्रमांक ६, रामबाग रोड, फिरोजपूर कॅन्ट, फिरोजपूर, पंजाब-१५२००१ वर परत करावी.

दिनांक :०४/१२/२०२५

ॲड. किमया आर. गोडबोले
आर्केडिया, एनसीपीए रोड,
नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२१
संपर्क : ९८१९०३९३६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे बलीवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीं आहेत, या मिळकतींच्या मालकांकडुन आमचे अशिलांनी सदरील मिळकतीं विकत घेणेचे ठरविले आहे.

| अनुक्रमांक | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ०१ | ३१/४ | ००-३८-०० | ०-२५ |
| ०२ | ३१/१/ब | ०४-५०-०० | २-६२ |
| ०३ | ३१/१/अ | ०३-९४-०० हे. आर. पॉ. या एकूण क्षेत्रापैकी ०१-९७-०० हे. आर. पॉ. इतके क्षेत्र | १-३१ |
| ०४ | ३१/१/क | ०३-९२-०० हे. आर. पॉ. या एकूण क्षेत्रापैकी ०१-८२-०० हे. आर. पॉ इतके क्षेत्र | ०-९७ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४ डिसेंबर २०२५

**ॲड.शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को.ऑ.हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### पनवेल महानगरपालिका

**पशुवैद्यकीय विभाग**
**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२ - २७४५८०४०/४१/४२ | फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ | आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com | वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/पशुवैद्यकीय सेवा/१२२३/२०२५-२६ | दिनांक: ०३/१२/२०२५

**जाहीर सुचना**

पनवेल महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय मोबाईल युनिट मार्फत पाळीव श्वान व मांजर कार्य शिबिराकरिता आवश्यक असणारी औषधे/औषधी साहित्य व इतर सामग्री खरेदी करणेकामी. इच्छुकांनी सदरचे निविदा दर दि. १०/१२ /२०२५ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांका नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

| Sr. No. | Category | MEDICINE | Tender Unit | Name of Manufacturer | Rate / Unit Without GST |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Vaccine | Anti-Rabies Vaccine 10 ML | 1 | | |
| 2 | Tab | Calcium Tablet (30 Tab) | 1 | | |
| 3 | Shampoo | Dog and Cat Shampoo 200 ML | 1 | | |
| 4 | Soap | Dog and Cat (Anti-Bacterial) Soap 75 GM | 1 | | |
| 5 | Spray | Gamma Bhc, Proflavine Hemisulphate and Cetrimide Spray | 1 | | |

**या कामी अटी व शर्ती खालील प्रमाणे:-**
१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
२. पॅनकार्ड ( संस्थेचे नावाने अथवा मालकाचे नावाचे )
३. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे वाहतुक खर्चासह समाविष्ठ असावेत.
४. सदरची जाहीर सूचना फक्त दर खात्री करणे करीता मागविणेत येत आहे.
५. या कामी काही माहीती हवी असलेस पशुवैद्यकीय विभागाकडे संपर्क साधावा.
६. या कामी दरांची खात्री झालेनंतर जाहीर निविदा मागविणेत येईल.

सही/-
**मा. उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## निवडक




### जागतिक दिव्यांग दिन संपन्न

**उरण :** जागतिक दिव्यांग दिन दरवर्षी ३ डिसेंबर रोजी जगभरात साजरा केला जातो. १९९२ पासून संयुक्त राष्ट्र संघातर्फे हा दिन जाहीर केला गेला. हा दिवस दिव्यांग व्यक्तींबाबत सामान्य जनतेत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने साजरा केला जातो. दिव्यांग सामाजिक संस्था उरण यांच्यावतीने बुधवारी (दि.३) जेएनपीए बहुउद्देशीय सभागृहात तालुक्यातील दिव्यांग बांधवांकरत जागतिक दिव्यांग दिन सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाव्यवस्थापिका प्रशासन व सचिव मनीषा जाधव, जेएनपीए विश्वस्त रवींद्र पाटील, जेएनपीए मॅनेजर इस्टेट सयाजी साळुंखे, अरविंद घरत, संदीप घरत, दिव्यांग प्रशासन अलिबाग वर्षा म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, विशाल पाटेकर, ॲड. धीरज डाकी, विठ्ठल ममताबादे, पत्रकार उत्कर्ष समितीचे तालुकाध्यक्ष पूजा चव्हाण, तृप्ती भोईर, सायली साळुंके आदी मान्यवर उपस्थित होते.




### लिटिल एंजलचा पारितोषक वितरण

**हमरापूर :** पेण शहरातील को.ए.सो. लिटिल एंजल शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शैक्षणिक, कला, क्रीडा, विज्ञान व विविध क्षेत्रात विशेष प्राविण संपादन केलेल्या नर्सरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. यावेळी स्कूल कमिटी सदस्य कृष्ण वर्तक, चंद्रकांत म्हात्रे, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका प्रीता कारखानिस, प्रायमरी मुख्याध्यापिका सविता चव्हाण, माध्यमिक मुख्याध्यापिका तृप्ती वणगे, शाळेचे शिक्षक तसेच पालक वर्ग व विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच, सुमारे १९०० पट असलेल्या विशेष ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची मोठी संख्या असलेल्या, शैक्षणिक स्पर्धेत सातत्याने शंभर टक्के निकालाची परंपरा राखून ठेवल्याबद्दल सर्व शिक्षक वृंदांचे व विद्यार्थ्यांचे पालक वर्गातून कौतुक होत आहे.

### पनवेलमधील चार अट्टल चोरांना अटक

**पनवेल :** येथील ए-टॅक इंटरप्रायझेस कंपनीच्या उरण ते गव्हाणफाटा या रस्त्यावर असलेल्या रेल्वे ब्रिजच्या बांधकाम साईटवर चार अनोळखी चोरट्यांनी येथील वॉचमनचे हात रस्सीने बांधुन त्यास मारहाण केली होती. तसेच, त्या ठिकाणावरुन रेल्वे ब्रिज बनविण्याचे लोखंडी साहित्य व सामानाची चोरी केली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यावेळी गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेल यांचे विशेष पथक स्थापन करण्यात आले. त्यांनी तांत्रिक तपासाच्या आधारे बेलापुर येथुन आरोपी समशेर शेर खान (२१) व कुलदिप बच्चु सिंग (२३) यांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच, पनवेल शहर, कामोठे तसेच उलवा पोलीस ठाणे हद्दीतुन बिल्डींग बांधकामाकरीता वापरण्यात येणारे स्टिल व इतर साहित्य चोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले. त्यानंतर कळंबोली येथील गुरूनाथ नरशेट्टी (६४) यांच्या घरात झालेल्या चोरीचा देखील उलगडा झाला आहे. नगरशेट्टी पतीपत्नी बाहेरगावी गेले असताना त्यांच्या घरात चोरी झाली होती. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद आहे. विशेष पथकाने तांत्रिक तपासाद्वारे या गुन्ह्यातील आरोपी सलिम मोहम्मद शेख (३७) व तौफिक मोहम्मद शेख (३२) यांना अंबरनाथ येथुन ताब्यात घेतले. या दोन आरोपींची कसून चौकशी केली असता घरफोडीचा गुन्हा उघडकीस आले आहेत. यासह पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४ गुन्हे व कामोठे १ व उलवा येथील १ गुन्हे उघडकीस करण्यात पोलिसांना यश आले आहे.

### अपहरणकर्त्याला पकडण्यासाठी शोध मोहिम

**पनवेल :** मध्यप्रदेशमधील धार जिल्ह्यातील पीथमपुर येथील भदईराम उर्फ रामनाथ उर्फ रामबाबू याने धन्नड या गावातून ७ वर्षीय शिवानी या मुलीचे अपहरण करुन तो गायब झाला होता. १० एप्रिल रोजी त्याने या मुलीचे अपहरण केले होते. याबाबत पीथमपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या आरोपीला खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दित पाहिले गेले असल्याने खांदेश्वर पोलीसही या आरोपीचा शोध घेत आहेत. या आरोपीबाबत कुणाला अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, याबाबत माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असल्याचेही पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

# वाढलेले मतदान कोणाच्या पथ्यावर?

## माथेरानमध्ये ५ हजार मतदार वाढले




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरानमध्ये २०१६-१७च्या निवडणुकीनंतर तब्बल ५ हजार मतदार वाढले आहेत. त्यामुळे वाढलेले मतदार आणि प्रत्यक्ष झालेले अधिकचे मतदान यांचा फायदा कोणत्या राजकीय पक्षांना होणार, याची गोळाबेरीज करण्यात माथेरानकर गुंतले आहेत. मागील वर्षी झालेलया विधानसभा निवडणुकीत काही मतांची असलेली पिछाडी महायुती भरून काढणार का? तसेच, माथेरान नागरी पतसंस्थेच्या निवडणुकीत एकत्र आलेले राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शिवराष्ट्र पॅनल माथेरान नागरी पतसंस्थेनंतर माथेरान नगरपरिषद जिंकणार का? याकडे माथेरानकरांचे आणि राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागून राहिले आहे.**

माथेरानमध्ये २०१६-१७ मध्ये शिवसेना पक्षाने घवघवीत यश मिळवित नगरपरिषदेच्या सदस्यपदाच्या १४ जागा आणि थेट नगराध्यक्ष अशी आघाडी घेतली होती. त्यानंतर ५ वर्षांनी होणारी सार्वत्रिक निवडणूक ८ वर्षे उलटले तरी पार पडली नव्हती. अखेर मंगळवारी (दि.२) माथेरानसह जिल्ह्यातील इतर नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणूका पार पडल्या. या निवडणुकीत माथेरानमध्ये चक्क ८५ टक्के हुन अधिक मतदान झाले आहे. तत्पुर्वी, अंदाजे ८० टक्के पर्यंत मतदान होईल, असे गृहीत धरले जात होते. २०१६-१७ नंतर होणाऱ्या निवडणुकीत तब्बल ५ हजाराच्या आसपास मतदार वाढले आहेत. त्यामुळे वाढलेले हे मतदान कोणाच्या पथ्यावर पडणार, हे २१ डिसेंबर रोजी कळणार आहे.

दरम्यान, निवडणूकीच्या प्रचारामध्ये माथेरान शहराच्या प्राथमिक गरजा आणि पयर्टकांसाठी उत्तम सोयीसुविधांचे स्वप्न मतदारांना महायुती आणि शिवराष्ट्र पॅनलकडून दाखवण्यात आले. पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानसाठी पर्यटकांच्या वाहनांच्या पार्किंगची समस्या महत्वाची समजली जाते. त्याचवेळी पर्यायी मार्ग, फिनिक्युलर रेल्वे, रोपवे, प्रेक्षणीय स्थळांचा पर्यावरण पूरक विकास, तसेच येथील ई-रिक्षा आणि घोड्यांचे प्रश्न यावर येथील निवडणुकीच्या रिंगणनात उतरलेल्या दोन्ही बाजूंनी आश्वासने देण्यात आली. मतदारांना प्रलोभने दाखवताना राज्याचे पर्यटन मंत्र्यांनी माथेरानच्या विकासाचा रोडमॅप तयार करून दरवर्षाला आढावा घेतला जाईल, असे आश्वासन दिले आहे. तर, राष्ट्रवादी काँग्रेसकडून माथेरानची ओळख असलेली चिक्की आणि चामड्याच्या वस्तूंना पेटंट म्हणून विकसित करून बचत गटांच्या माध्यमातून या दोन क्षेत्रात रोजगार निर्मिती करण्याचे आश्वासन दिले गेले. आश्वासने आणि एम फॅक्टरने मतदानाच्या आदल्या दिवसापर्यंत बजावलेली भूमिका यामुळे मतदार मोठ्या प्रमाणात बाहेर पडल्याचे दिसून आले.

### पतसंस्थेचा निकाल कायम राहणार?

माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीलाच्या ६ महिने आधी माथेरान नागरी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक होते. माथेरानमधील बहुसंख्य नागरिक हे या पतसंस्थेचे खातेदार आहेत. त्यांचे मतदान असलेलीच माथेरान नागरी पतसंस्थेची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिवराष्ट्र पॅनलने जिंकली. या निवडणुकीचे निकाल माथेरान नगरपरिषदेत जाण्याची पायरी समजली जाते. मात्र, पराभव झाल्यानंतर पालिका निवडणुकीसाठी माथेरानमधील शिवसेना आणि भाजपने नियोनबद्ध तयारी केली होती. त्यामुळे पतसंस्थेचा निकाल यावेळी देखील कायम राहणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मतदानाची गोळाबेरीज आमदारांना वरचढ

विधानसभा निवडणुकीत माथेरान शहरातील चार प्रभागात शिवसेना-भाजप युतीला १,३२४ मते मिळाली होती. तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे बंडखोर अपक्ष उमेदवाराला १,३५१ आणि शिवसेना ठाकरे पक्षाच्या उमेदवाराला २४५ मते मिळाली होती. या पालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे यांचे शिवराष्ट्र पॅनल असल्याने त्यांच्या विधानसभा निवडणुकीतील मतांची गोळाबेरीज केली तर ती १,५९६ इतकी होती. त्यामुळे हि संख्या आमदार महेंद्र थोरवे यांना पडलेल्या मतांपेक्षा पावणे तीनशेने अधिक आहे. त्यामुळे शिवराष्ट्र पॅनल बाजी मारणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रेवदंडा पोलिसांचा अजब कारभार




- घरफोडी सारख्या गुन्ह्यांची नोंद करण्यास दिरंगाई
- उशिराचे कारण तक्रारदारांवर ढकलण्याचा प्रताप

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील महाजने येथे नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून दोन घरफोडीच्या घटना घडल्या होत्या. मात्र, आठ ते दहा दिवस उलटून गेले तरी रेवदंडा पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला नाही. उलट तक्रार उशिरा दिल्याचे कारण देण्यात आल्याने रेवदंडा पोलिसांचा अजब कारभार उघड झाला आहे.

अलिबाग तालुक्यातील महाजने येथील दोन ठिकाणी घरफोडी झाली. येथील पारंगे यांच्या घरातील सोन्याचा ऐवज चोरट्याने चोरून नेला. रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्यावर तेथील एका पोलिसाकडून अर्ज करून मुद्देमाल गेलेला लिहून घेऊन या, असे सांगण्यात आले. त्यामुळे १६ ते २७ नोव्हेंबरच्या कालावधीत झालेल्या गुन्ह्याची नोंद १ डिसेंबरला करण्यात आली. यावेळी पोलिसांकडून सांगण्यात आले की, पारंगे यांनी नातेवाईक व शेजारी यांच्याकडे दागिन्यांची चौकशी केली. यादरम्यान दागिने मिळून आले नाही, त्यानंतर त्यांनी तक्रार दाखल केली, असे कारण पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले. तसेच, नोव्हेंबरमध्येच रेवदंडा मोठा कोळीवाड्यातील एका मंदिरातील चांदीचे चार देवतांचा चांदीचा मुखवटा लंपास केल्याची माहिती स्थानिकांकडून उपलब्ध झाली. मात्र, त्याची नोंदही तात्काळ करण्यात आली नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रेवदंडा पोलिसांनी त्यांच्याकडील चुक सर्वसामान्यांकडेच ढकलल्याचे समोर येत आहे. महाजनेमध्ये वारंवार चोरी, घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. त्याचा मात्र अद्यापर्यंत तपासच लागला नाही. त्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. घरफोडीच्या गुन्ह्याची उकल करण्यास पोलीस यशस्वी ठरतील का, असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे.

> **तक्रारदार तक्रार देण्यास आल्यास तात्काळ त्याची नोंद करणे आवश्यक आहे. तक्रार करण्यास उशीर करणे चुकीचे आहे.**
> **- माया मोरे,** उपविभागीय पोलीस अधिकारी

# माथेरानमधील क्रांतीज्योत अखेर प्लास्टिकमुक्त

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



माथेरान शहरात नगरपरिषद निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली होती. त्यावेळी वखार नाका येथे असलेली क्रांतीज्योत निवडणूक प्रशासनाने झाकून ठेवली होती. कारण ही क्रांतीज्योत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे निवडणूक असलेले मशाल चिन्ह आहे. परंतु, ही क्रांतिज्योत झाकून ठेवताना चक्क सिमेंट पिशवीचा वापर केल्याने शिक्षणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर माथेरान नगरपरिषद निवडणूक यंत्रणेला आपली चूक लक्षात येताच क्रांतिज्योत सिमेंट पिशवी मुक्त केली. ही क्रांतीज्योत माथेरान शहरात महात्मा गांधी रस्त्यावर वखार नाका येथे प्राचार्य गव्हाणकर चौकात उभारण्यात आली आहे. या चौकात माथेरानमध्ये शाळा उभारून शिक्षणाची दारे उघडणाऱ्या गव्हाणकर यांचा गौरव करण्याचा प्रयत्न झाला आहे. परंतु, हीच क्रांतीज्योती नगरपरिषद निवडणुकीत निवडणूक यंत्रणेसाठी अडथळा ठरली होती. यावेळी मशाल आणि क्रांतीज्योत यात काही फरक वाटत नाही का? असा प्रश्न शिक्षणप्रेमींनी उपस्थित केला होता. शेवटी निवडणूक यंत्रणेने ही क्रांतीज्योत सिमेंट पिशवी मुक्त केली.



● मुरुड-एकदरा परिसरातील कोळी बांधव दत्त जयंतीसाठी आपल्या घरी परतले आहेत. यावेळी या बांधवांनी आपल्या बोटी किनाऱ्यावर नांगरल्या आहेत. ३ दिवसांची यात्रा संपन्न झाल्यावर पुन्हा मासेमारीसाठी समुद्रात उतरतील. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# करंजा-रेवस रो-रो सेवेचे काम रखडले

## नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

करंजा-रेवस सागरी मार्गावरील ३४ कोटी खर्चाच्या रो-रो जेट्टीचे काम कंत्राटदार अर्ध्यावरच सोडून गेल्याने मागील काही महिन्यांपासून हे काम रखडले आहे. तसेच, हे काम पूर्ण करण्यासाठी खर्चात देखील वाढ झाली आहे. त्यामुळे आता पुन्हा नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती मुंबई सागरी महामंडळाचे कार्यकारी अभियंता मनिष मेतकर यांनी दिली आहे.

रेवस-करंजा रो-रो प्रकल्पाचे काम सागरमाला योजनेतून सुरू करण्यात आले होते. या प्रकल्पाच्या कामावर मोठ्या प्रमाणावर खर्चही करण्यात आला आहे. परंतु, अद्यापही या सागरी मार्गावरील काम अपूर्ण अवस्थेत असल्याने रो-रो सेवा सुरू झालेली नाही. करंजा बंदरातील रो-रो जेटीचे काम पूर्ण झाले असून रेवस येथील रो-रो जेट्टीचे काम मागील काही महिन्यांपासून रखडले आहे. येथे काही प्रमाणात बांधकाम, ब्रेकवॉटर जेट्टी, ड्रेझिंग, वाहनतळ व जोडरस्त्यांची कामे करण्यात आली आहेत. समुद्रातील पायलिंगची बहुतांश कामेही अद्याप अपुऱ्या अवस्थेत आहेत. मात्र, ठेकेदार जेट्टीचे काम अपूर्ण सोडून गेल्याने करंजा-रेवस रो-रो सेवेचे काम रखडले आहे. रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी आचारसंहिता संपुष्टात येताच आता नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

### खर्चात वाढ

करंजा-रेवस मार्गावरील रा-रो जेट्टीचे काम संबंधित कंत्राटदाराने अर्ध्यावरच सोडले आहे. त्यामुळे हे काम काही महिन्यांपासून रखडले आहे. तसेच, हे काम पूर्ण करण्यासाठीच्या खर्चात देखी वाढ झाली आहे. त्यामुळे आता नव्याने निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती अभियंता मनिष मेतकर यांनी दिली.

या विलंबामुळे कामाच्या खर्चातही वाढ होणार आहे. निविदा प्रक्रीयेनंतर वर्षभराच्या कालावधीत रखडलेल्या करंजा-रेवस रो-रो सेवेचे काम पूर्ण होईल, अशी माहिती मुंबई सागरी महामंडळाचे कार्यकारी अभियंता मनिष मेतकर यांनी दिली.

# कळंबोलीतील हत्येचा गुन्हा उघडकीस

- अवघ्या २४ तासांत दोन आरोपी अटकेत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**


कळंबोलीतील केंद्रिय भंडारम निगम बोर्डाच्या समोरील रस्त्यावर रत्नेशकुमार राजकुमार जैस्वाल या व्यक्तीला हाताबुक्यांनी व लाकडी दांडक्याने डोक्यात व इतर ठिकाणी मारहाण करून त्याला गंभीर जखमी करण्यात आले होते. त्याला उपचारासाठी कामेठे येथील एमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले होते. परंतु, रत्नेशकुमार याचा हॉस्पीटलमध्ये पोहोचण्यापुर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषीत केले. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, या गुन्ह्यातील आरोपींना अवघ्या २४ तासांत अटक करण्यात आली आहे.

या घटनेचा शोध घेण्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांकडे तपास करण्यासाठी २ वेगवेगळी पथके तयार केली होती. त्यानुसार केलेल्या तपासात हा गुन्हा दोन अनोळखी व्यक्तींनी केल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने तपास केला असता हा गुन्हा स्कुटी वरून आलेल्या दोन व्यक्तींनी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. त्या स्कुटीची माहिती घेऊन पुढील तपास करण्यात आला. त्यानंतर मोहम्मद चाँद शाबीर शेख (२५) व जुएफ जमिल ईलियास शेख (२५) या दोघांना विश्वासात घेऊन अधिक तपास करण्यात आला. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कळंबोली स्टिल मार्केट सर्व्हिस रोड येथे उभे असलेल्या तृतीयपंथी यांच्यासोबत त्यांचा वाद सुरू झाला. हा वाद मिटविण्यासाठी रत्नेशकुमार जैसवार व त्याचे मित्र आले होते. त्याचा राग मनात धरून मोहम्मद चाँद व जुएफ यांनी रत्नेशकुमार जैसवार याच्याशी वाद घातला. त्यांनी हाताला मिळेल त्याने रत्नेशकुमार वर हल्ला करत गंभीर जखमी केले आणि तेथून पळून गेल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत पुढील तपास गुन्हे शाखा कक्ष ३ पनवेल करीत आहेत.

**एकमेव वास्तूची देखील पडझड | उरणकरांकडून डागडुगीची मागणी**

# द्रोणागीरी किल्ला मोजतोय अखेरची घटका

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



उरण तालुक्यातील द्रोणागिरी पर्वतावरील किल्ला आज शेवटची घटका मोजत आहे. ३ किलोमीटर पर्यंत विस्तार असलेल्या या किल्ल्यावर आज एकच वास्तू आपल्या इतिहासाची साक्ष देत उभी आहे. तर, इतर वास्तू आणि किल्ला नामशेष झाला आहे. उरणकरांना आणि पुढच्या पिढ्यांना इतिहासाची माहीती होण्यासाठी येथील उरलेसुरले अवशेष जपले जावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

प्रभू राम आणि रावण यांच्यात झालेल्या युद्धात लक्ष्मणाला बाण लागून लक्ष्मण मुरछित पडले. त्यांच्या उपाचारासाठी संजीवनी आणायला गेलेल्या हनुमंताने द्रोणागिरी पर्वतच उचलून आणल्याच्या कथा आपण ऐकत आलो आहोत. त्याच द्रोणागिरी पर्वताचा एक भाग उरणच्या भूमीत पडला. आणि याच द्रोणागिरी पर्वतावर सुमारे १२०० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला द्रोणागिरी किल्ला आपल्या इतिहासाच्या शेवटच्या घटका मोजत आहे. शिलाहर काळात हा किल्ला बांधला गेला असल्याच्या खुणा येथे सापडत आहेत. तर, या किल्ल्यावर अनेक शासकांनी शासन केले असून, आरबी समुद्रातून होणारे आक्रमण रोखण्यामध्ये या किल्ल्याची प्रमुख भूमिका होती. अनेक बदल, युद्ध, रक्तपत आणि सत्ता बदल पाहिलेला हा किल्ला आज शासकीय अनास्था आणि दुर्लक्षपणामुळे संपूर्ण नष्ट झाला आहे. १५३० ते १५३५ या काळात पोर्तुगीजांकडून बांधलेल्या काही इमारतींमधील आज एक इमारत निसर्ग आणि इतर परिस्थितीशी झुंज देत आपला इतिहास ओरडून सांगण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, या किल्ल्यावरील शिल्लक राहिलेल्या एकमेव वास्तूची देखील मोठ्या प्रमाणावर पडझड होत आहे. त्यामुळे या किल्ल्याचे उरलेल्या अवशेषाकडे शासनाने लक्ष केंद्रित करावे आणि उरणच्या इतिहासातील महत्वाचा आणि दुर्लक्षित इतिहास सुरक्षित करावा, अशी मागणी उरणकर करत आहेत.

> **सद्या द्रोणागिरी किल्ला शेवटची घटका मोजत आहे. दुर्गसंवर्धक संस्था शासनाच्या पुरातत्त्व खात्याला पत्रव्यवहार करून किल्ल्याचे संवर्धन होण्यासाठी प्रयत्न करताताच. मात्र, हा ऐतिहासिक अमूल्य ठेवा शाबूत ठेवण्यासाठी शासनाने संवर्धनाच्या दृष्टीने लक्ष देणे गरजेचे आहे.**
> **- कौशिक ठाकूर,** दुर्ग संवर्धक, उरण

**राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलाइजर्स लिमिटेड**
(भारत सरकार चा उपक्रम)
प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई - 400 074
CIN-L24110MH1978GOI020185
Let us grow together
A NAVRATNA COMPANY

जाहिरात क्र.15072025

**ट्रॉम्बे/थळ युनिट/ विभागीय कार्यालयांसाठी संपूर्ण भारतात भरती**

राष्ट्रीय केमिकल्स अँण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ लिमिटेड) ही खते आणि औद्योगिक रसायनांचे उत्पादन आणि विपणन व्यवसायातील एक अग्रणीय नफा कमवणारी "नवरत्न" कंपनी आहे, ज्याचा एकूण व्यवसाय सुमारे रु.16933.64 कोटी आहे. राष्ट्रीय स्तरावरील विपणन नेटवर्कसह त्याचे उत्पादन युनिट महाराष्ट्र (ट्रॉम्बे चेंबूर, मुंबई आणि थळ, जिल्हा-रायगड) मध्ये आहेत. कंपनी उत्कृष्ट करियर विकास संधी प्रदान करते. कंपनी खालील पदांची भरती करू इच्छित आहे:

| अनु. क्र. | पद कोड | शाखा व पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | MTSAFT/082025 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (सुरक्षा) | 8 |

इच्छुक उमेदवार अधिक माहितीसाठी कंपनीची वेबसाइट www.rcfltd.com वरील 'रिक्रूटमेंट' सेक्शन पहावे.

**कार्यकारी संचालक (मा.सं.)**

समृध्दीची एकत्र वाटचाल

# गणगौळण तर झाली...

नगरपालिका व पंचायतींच्या निवडणुकांचे मतदान मंगळवारी पार पडले. त्यावेळी ठिकठिकाणी झालेल्या हाणामाऱ्या आणि पडलेला पैशांचा पाऊस महाराष्ट्र नामक प्रगत राज्याचा भेसूर चेहरा दर्शवणारे आहे. शिवाय ही तर केवळ झलक किंवा ट्रेलर किंवा तमाशाच्या भाषेत गणगौळण होती. खरा सिनेमा वा तमाशा अजून पुढे व्हायचा आहे. यातला दुसरी झलक २१ डिसेंबरला निकाल येतील तेव्हा पाहायला मिळेल. तर खरा सिनेमा महापालिका व जिल्हा परिषदांच्या निवडणुकांच्या वेळी दिसेल. विरोधकांनी आपापली ताकद होती तिथेच मर्यादितपणे निवडणुका लढवल्या होत्या. उद्धव ठाकरे किंवा शरद पवार यांनी जवळपास कोठेही प्रचार केला नाही. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार आपापल्या भागात फिरले. बाकी बहुतांश मैदान महायुतीला मोकळेच सोडण्यात आले होते. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. भाजप विरुध्द शिंदे विरुध्द अजितदादा अशीच ही खरी लढत झाली. सत्तेसाठी वाटेल ते करू हे यांचे ब्रीद असून गेल्या पाच वर्षांमध्ये त्याची प्रचीती वारंवार आली आहेच. आता विरोधक दुर्बळ आहेत म्हटल्यावर सर्व सत्ता आपल्याकडेच खेचण्याची यांची गडबड सुरू झाली. त्यातून हे एकमेकांच्या जिवावर उठले. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातून तर विस्तव जात नाही अशी स्थिती आली. संभाजीनगरात एकाच हॉटेलात मुक्काम करूनही दोघांमध्ये संभाषण देखील झाले नाही. हा त्याची लंका जाळतो आहे तर तो यालाच रावण म्हणतो आहे. याचाच परिणाम काल मतदानाच्या दिवशी दिसून आला. राज्यभर अनेक ठिकाणी महायुतीच्याच तीन पक्षांमध्ये आपसात हाणामाऱ्या झाल्याचे दिसले. रायगड जिल्ह्यात तर कहर झाला. एकाकडे पिस्तूल सापडले. एकदुसऱ्यांवर हल्ले झाले. पोलिस बघ्याची भूमिका घेत राहिले. नगरपालिकेच्या दोन वॉर्डांसाठी ही इतकी मारामारी झाली. तर उद्या हजारो कोटींच्या महापालिका व त्यानंतर राज्य सरकारसाठी हे नतद्रष्ट लोक कोणत्या थराला जातील याचा विचारच केलेला बरा. रोह्यातही राष्ट्रवादी आणि भाजपमध्ये घमासान झाले. एकदुसऱ्यांवर पैसे वाटल्याचे आरोप केले गेले.

## पैशांचा भयानक पाऊस

सर्वांचे लक्ष असलेल्या सिंधुदुर्गात सोमवार रात्रीपासूनच कहर झाला. मालवणात बाहेरून पैशांच्या थैल्या घेऊन गाड्या आल्या. त्या भाजपच्या लोकांच्या असल्याचे शिंदे सेनेचे आमदार निलेश राणे यांनी दाखवून दिले. मग भाजपच्या जिल्हा उपाध्यक्षांवर गुन्हा दाखल करणे भाग पडले. दीड लाखांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. मालवणात एका मताला पाच हजार रुपये इतका दर झाला होता असे म्हणतात. याच मालवणात गेल्या वर्षी शिवाजीराजांचा पुतळा पडला होता. त्याच्या भ्रष्टाचाराची चौकशी झालेली नाही. खटला चालू आहे. दरम्यान घाईघाईने नवीन पुतळा मात्र उभा राहिला आहे. हा पुतळा पाडण्याचे गुन्हेगार व नंतर तो उभे करणारे हेच लोक आता प्रचंड पैसे वाटून निवडणुका जिंकू पाहत आहेत. राजे असते तर या सगळ्यांचा त्यांनी कडेलोट केला असता. जे सिंधुदुर्गात तेच बदलापूर, नाशिक, नांदेड, बुलढाणा अशा अनेक ठिकाणी घडले. नाशिकमध्ये त्र्यंबकेश्वरमधून देवेंद्रांनी प्रचाराचा प्रारंभ केला होता. नाशिकवर देवेंद्र, शिंदे व दादा या तिघांनाही कबजा करायचा आहे. पण याच त्र्यंबकेश्वरमध्ये एकेका मताला २५ हजार रुपये दिले गेल्याची चर्चा आहे. हे असले काही ऐकले तर ज्ञानदेवांचे गुरु निवृत्तीनाथ पुन्हा समाधी घेतील. भगूर या वीर सावरकरांच्या गावातही कमी-अधिक फरकाने हेच घडले. मनमाड, निफाड, सिन्नर इथेही खुलेपणाने पैशांची देवाणघेवाण चालू होती अशा बातम्या आहेत. नरेंद्र मोदी यांनी देशातील काळा पैसा जर नष्ट केलेला आहे तर हे इतके लाखालाखांनी रोख पैसे उमेदवारांकडे येतात कुठून, ते फक्त पत्रकार व जनतेलाच कसे दिसतात, पोलिस व निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना का दिसत नाहीत असे अनेक प्रश्न या निमित्ताने निर्माण होतात. गंमत म्हणजे २१ डिसेंबरनंतर हे निर्लज्ज युतीवाले पुन्हा मंत्रालयात एकत्र बसू लागतील व विरोधकांना लोकशाही, सदाचार इत्यादींचे उपदेश करू लागतील. कालपरवाच आपण एकमेकांच्या विरोधात लढलो व टोकाची टीका केली हे विसरून जातील.

## आयोग असे का वागतो?

एकूण स्थानिक पातळीवरच्या निवडणुका म्हणजे टीव्हीवरच्या होम मिनिस्टरसारखा खेळ आहे असाच सगळ्यांचा समज झालेला दिसतो. त्यातून हा सर्व खेळखंडोबा झाला आहे आणि मतदारही उघड्या डोळ्याने व काही ठिकाणी नोटांनी भरलेल्या खिशांनी ते पाहत आहेत. स्थानिक निवडणुकांमध्ये लुटूपुटूची भांडणे करायची, विरोधकांची जागाही आपणच काबीज करायची, एकमेकांवर टीका करून घेऊन कार्यकर्त्यांमधील भडास बाहेर काढायला वाव द्यायचा आणि नंतर नेत्यांनी सावकाशपणे पुढे होऊन सर्व गोष्टींवर पडदा टाकल्याचे जाहीर करायचे असा हा सर्व तमाशा आहे. गणगौळण झाली आहे. आता मुख्य वगनाट्य जिल्हा परिषद व महापालिका निवडणुकांमध्ये सादर होईल.दरम्यान, निवडणूक आयोगाने शेवटच्या क्षणापर्यंत आपले घोळ चालू ठेवले. आधी दहा ठिकाणचे मतदान पुढे गेल्याचे जाहीर झाले होते. सोमवारी रात्री उशिरा २४ ठिकाणी निवडणूक स्थगित झाल्याचे स्पष्ट झाले. त्यातच मंगळवारी भाजपच्या एका उमेदवाराने कोर्टात धाव घेतली व बुधवारी होणारी मतमोजणी थांबवली. आता ही मोजणी बाकीच्या निवडणुकांच्या सोबतच म्हणजे २१ डिसेंबरला करा असा आदेश नागपूर खंडपीठाने दिला. या निकालांचा वीस डिसेंबरच्या मतदानावर परिणाम होऊ नये म्हणून असे केले गेले. देवेंद्र फडणवीसांपासून महायुतीच्या नेत्यांनीही या बदलांवर टीका केली आहे. तरीही हा सगळा संशयास्पद प्रकार आहे. जो निवडणूक आयोग कालपर्यंत स्पष्टपणे महायुतीच्या तंत्राने चालत होता तो एकाएकी स्वतंत्र व स्वायत्तपणे निर्णय कसे घेऊ लागला हे कोडे या निमित्ताने निर्माण झाले आहे. मतमोजणी लांबणीवर टाकण्याचा निर्णय न्यायालयाचा असला तरी भाजपचेच यात काहीतरी कटकारस्थान असावे असा संशय निलेश राणे, हर्षवर्धन सपकाळ यांच्यापासून सामान्य नागरिकांनाही येतो आहे. आपण दे आयोगावर टीका केली. पण अशीच टीका यापूर्वी जेव्हा राहुल गांधी यांनी केली होती तेव्हा देशाच्या सार्वभौम यंत्रणांचे खच्चीकरण चालू असल्याचा आरोप त्यांच्यावर भाजपवाले करीत होते. देवेंद्र हेही त्यात आघाडीवर होते. आता तेच देवेंद्र निवडणूक आयोगाने बेकायदा निर्णय घेतल्याचे म्हणत आहेत. दरम्यान, उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने निवडणूक आयोगाला पुढच्या निवडणुकांसाठी तरी योग्य कार्यक्रम आखणी करा अशी तंबी दिली आहे. आयोग ती पाळतो का हे पाहावे लागेल. आता काही ठिकाणी मतदान व सर्व निवडणुकांची मतमोजणी पुढे गेल्याने काल मतदान झालेल्या ठिकाणच्या मतपेट्यांमध्ये काही गडबड तर केली जाणार नाही ना असा संशय निर्माण झाला आहे. या पेट्यांच्या सुरक्षिततेबाबत फडणवीस सरकारच्या पोलिसांवर भरवसा ठेवणे कठीण आहे. त्यामुळे विरोधकांनाच याबाबत सजग राहून जागता पाहरा द्यावा लागणार आहे.

विचार

# नैसर्गिक शेतीचे वास्तव

***अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांनी ज्याप्रमाणे पारंपरिक शेतीचा त्याग करून रासायनिक शेतीचा अवलंब केला, तसा भारतातील शेतकऱ्यांनी केल्यास या वर्गातील वाढत्या आत्म हत्यांच्या समस्येवर मात करता येईल. छोटे कृषी क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचा अवलंब करणे अपरिहार्य आहे. दोन्हीची सांगड घालून शेती व्यवसाय समृद्ध करणे हे खरे आव्हान आहे. नैसर्गिक शेतीचे वास्तव शोधणारा हा खास लेख.***



**मुकुंद गायकवाड**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील शेतकऱ्यांना नुकतेच एक आवाहन केले. ते म्हणाले, 'भारत हे जगातील नैसर्गिक शेतीचे आगर होणार आहे. त्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतीपैकी निदान एक एकर तरी शेती नैसर्गिक शेती पद्धतीने करावी.' त्याचाच धागा पकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्र या बाबतीत देशातील राज्यांमध्ये अग्रगण्य ठरेल. 'नैसर्गिक शेती खरोखर किफायती असेल किंवा या पद्धतीच्या शेतीमुळे शेतकऱ्यांच्या दुर्दैवी आत्महत्या थांबणार असतील तर शेतकरी आपणहून ही पद्धत स्वीकारतील.' वस्तुत: भारतामध्ये अमेरिकेच्या धर्तीवर ४५ पेक्षा जास्त विद्यापीठे स्थापन झाली असून प्रत्येक राज्यात शेती खाते आहे. महाराष्ट्राच्या चार विभागात चार कृषी विद्यापीठे स्थापन झाली असून त्यांच्याकडे प्रत्येकी आठ हजार एकर अशी एकूण ३२ हजार एकर जमीन आहे. याशिवाय संशोधन केंद्र आणि शेती खात्याचे मिळून महाराष्ट्रात सुमारे ५०,००० एकर क्षेत्र सरकारच्या ताब्यात आहे. त्यातील अर्धा भाग नैसर्गिक शेतीखाली आणला तरी मिळणारे उत्पादन पाहिले तर नैसर्गिक शेतीचे तंत्रज्ञान आपोआप स्वीकारले जाईल. अशा पद्धतीने महाराष्ट्रातील शेतकरी एक एकरच काय, आपले संपूर्ण क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणून पंतप्रधानांचे आवाहन प्रत्यक्षात उतरू शकेल. कृषी विद्यापीठांच्या मालकीच्या जमिनी केवळ अध्यापन प्लॉटपेक्षा खूप जास्त आहेत. त्या शेतकरी सक्षमीकरण, प्रात्यक्षिक आणि महसूल निर्मितीसाठी जिवंत प्रयोगशाळा आणि शक्तिशाली साधने आहेत. शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी या जमिनींचा थेट वापर करून शेती करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा करून त्यांची उत्पादनक्षमता वाढवता येईल. विद्यापीठातील जमिनींचा वापर प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांसाठी करून शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची क्षमता वाढवून चांगल्या नफ्यात रूपांतर करायला मदत करता येईल. या विद्यापीठांमधून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध उपक्रम चालवले जाऊ शकतात.

अमेरिकेतील कृषी विद्यापीठाने आणि शेती खात्याने जी प्रचंड प्रगती केली, ती भारतातल्या कृषी विद्यापीठांना आणि शेती खात्याला करता आली नाही, हे वास्तव नाकारून चालणार नाही. आपल्याकडे झालेली हरित क्रांती मेक्सिकोमधील डॉ. बोरलॉग यांच्या संशोधनामुळे झाली. येथील गव्हाच्या जातींची बियाणे आपण विमानाने आणून पंजाब आणि हरियाणा या राज्यांमधील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध केली. त्यातून हरित क्रांती निर्माण झाली आणि देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. त्यानंतर ५० वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेला, परंतु या देशात दुसरी हरित क्रांती झाली नाही, याची खंत धुरीणांना वाटत असावी. म्हणूनच त्यांनी नैसर्गिक शेतीचा आग्रह धरला आहे. नैसर्गिक शेती उत्पादनात भारताला जगात अग्रेसर करण्याचा विडा उचलणे ही स्तुत्य बाब आहे. पण यासाठी फक्त मोदी आणि फडणवीस यांनी शेतकऱ्यांना आवाहन करून चालणार नाही, तर आज अडचणींच्या गर्तेत असलेला शेती व्यवसाय आणि त्यावर अवलंबून असलेली ६४ टक्के जनता यांना समृद्ध करण्याचे खरे आव्हान आहे. देशातील सर्व माध्यमांचा वापर करून या प्रश्नी जनजागृती करणे, कृषी विद्यापीठे आणि शेती खात्याच्या जमिनीवर हजारो एकर डेमोस्ट्रेशन प्लॉट तयार करणे आणि त्यापासून आलेल्या उत्पादनांची श्रीमंत देशांमध्ये विक्री करण्याची पणन व्यवस्था निर्माण करणे या तीन मूलभूत बाबींवर कटाक्षाने लक्ष दिले तर यासंदर्भातील स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकते.

भारतीय शेती सुवर्णकाळात मसाल्यांच्या पदार्थांमुळे जगप्रसिद्ध झाली होती, आणि त्यातूनच स्पेनच्या राजवटीने १४९२ मध्ये कोलंबसला भारताच्या शोधासाठी आणि पोर्तुगीज राजवटीने वास्को द गामाला रवाना केले होते. परंतु त्याचा फायदा भारताला न होता जगाला झाला. अमेरिकेचा शोध लागल्यानंतर त्या देशाच्या संशोधकांनी नवीन तंत्र विकसित करून औद्योगिक क्रांतीच्या काळात शेती उत्पादन भरपूर वाढवून यांत्रिकीकरण प्रत्यक्षात आणले. आता त्यांची मजल जनुकीय जाती निर्मितीपर्यंत आली आहे. युरोप आणि अमेरिकेमुळे रासायनिक शेतीचा अंमल सुरू झाला आणि तो आजतागायत त्या राष्ट्रांच्या गळ्यातील ताईत बनलेला आहे. त्या मानाने भारताने ना पारंपरिक शेतीचा त्याग केला, ना संपूर्णपणे रासायनिक शेतीचा अवलंब केला. आज आपले रासायनिक उत्पादन इतके कमी आहे की, शेतकऱ्यांना आधार कार्ड वापरून रासायनिक खतांसाठी रांगा लावाव्या लागत आहेत. पुरेशा प्रमाणात खतांची उपलब्धताही नाही. पूर्वी भारतामध्ये जनावरांची संख्या भरपूर होती. त्यांचे शेण आणि सेंद्रिय पदार्थांमुळे शेतीला जीवदान मिळत होते. शेतीचे शास्त्र सांगते की, चांगले उत्पादन घेण्यासाठी १६ प्रकारच्या अन्नद्रव्यांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे. भरपूर जनावरे असल्याने पूर्वी ती गरज भागत होती. आपली शेती लहान प्रकारात मोडते, परकीय शेतीसारखे हजारो एकर क्षेत्र आपल्याकडे नसते. त्यामुळे अन्नधान्याची गरज घरच्या घरी उपलब्ध होत होती, बाहेरून काही आणावे लागत नव्हते. मानवाने सुमारे दहा हजार वर्षांपासून शेती व्यवसाय सुरू केला. प्राचीन शेतीमध्ये नाव कमावणाऱ्यांमध्ये इजिप्शियन संस्कृती, नेसोपोटियन संस्कृती, व्हायकिंग संस्कृती आणि इंका संस्कृती या जगप्रसिद्ध आहेत. चीन आणि भारताचा त्यात समावेश नाही. या संस्कृतीमध्ये वैशिष्ट्यपूर्ण शेतीपद्धती अवलंबण्यात आल्या होत्या. बॅबिलोन संस्कृतीचे हँगिंग गार्डन हे त्या वेळचे आणि आजचे जागतिक आश्चर्य म्हणून गणले गेले आहे. तीच इंका संस्कृतीची शेतीला पाणी द्यायची पद्धत वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. जगामध्ये सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी रासायनिक शेतीचा जन्म झाला. या शेतीला प्रथम जर्मनीमधील शास्त्रज्ञांनी व जपानमध्ये फुकोव्हा या प्रयोगाने विरोध केला होता. त्यातून सेंद्रिय शेती आणि बायोडायनामिक शेती प्रकार उदयास आले. आज रासायनिक शेतीमुळे कॅन्सरसारखे विकार वाढत असल्यामुळे जगाचे लक्ष नैसर्गिक शेतीकडे वळले. अधिक किंमत देऊन श्रीमंत देशातील लोक नैसर्गिक शेती उत्पादने खरेदी करण्याच्या मन:स्थितीत आहेत. परंतु त्यासाठी इस्रायलच्या पद्धतीची पणन व्यवस्था निर्माण व्हायला हवी.

रासायनिक शेतीचा उदय होताच अमेरिका आणि युरोपियन राष्ट्रांनी भरपूर प्रमाणात रासायनिक खतनिर्मितीचे कारखाने काढून खतनिर्मिती केली. तेथील शास्त्रज्ञांनी रासायनिक खतांना पूरक जमिनी निर्माण केल्या. त्यामुळे अमेरिका आणि युरोप जगाला अन्नधान्य पुरवू शकतील अशा परिस्थितीत येऊन पोहोचला. भारतात मात्र स्वातंत्र्यानंतर शेतीला प्राधान्य नसल्याने रासायनिक खतनिर्मिती त्या प्रमाणात झाली नाही. त्यामुळे दोन्ही घरचा पाव्हणा उपाशी अशी शेतकऱ्याची परिस्थिती झाली. त्याचा परिणाम म्हणून भारतीय शेतकरी आत्महत्या करू लागला आहे. भारतातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या ही एक गुंतागुंतीची समस्या आहे, ती प्रामुख्याने कर्जबाजारीपणा, हवामानबदल, अपयश आणि नफा न मिळाल्यामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटामुळे निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून आर्थिक स्थिरता, जोखीम कमी करणे आणि तंत्रज्ञानाचा अवलंब यावर लक्ष केंद्रित करणारा बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. शेतमालाची जोखीम कमी करणे, उत्पन्न सुधारणे आणि कर्जचक्र दूर करणे हे यावरील मुख्य उपाय आहेत.

अनुकूलित, परवडणारे आणि लहान शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असू शकणारे परदेशी तंत्रज्ञान हे भारतातील शेती उत्पादन वाढवायचा एक महत्त्वाचा भाग असू शकते. कीटकनाशके फवारणीसाठी ड्रोन, एआय-चालित सिंचन आणि पाणी-व्यवस्थापन साधने आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना संसाधनांचा वापर अनुकूलित करण्यास, हवामानाच्या पद्धतींचा अंदाज घेण्यास आणि पीक आरोग्य व्यवस्थापित करण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे जास्त उत्पादन मिळते आणि नुकसान कमी होते. दुष्काळ-प्रतिरोधक किंवा पूर-सहनशील आणि लवकर इशारा देणारी हवामानप्रणाली विकसित करण्यात परदेशी कौशल्य पीक अपयशाचा धोका कमी करू शकते, जे कर्ज आणि आत्महत्यांचे एक प्रमुख कारण आहे. शीतगृह, अन्न प्रक्रिया आणि कार्यक्षम गोदामांमध्ये प्रगत, बहुतेकदा परदेशी विकसित तंत्रज्ञान कापणीनंतरचे नुकसान कमी करू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनाचे चांगले मूल्य मिळू शकते. मुख्य म्हणजे शेतकऱ्यांना फायदेशीर जागतिक तांत्रिक प्रगतीचा फायदा मिळवून देणे, त्याचबरोबर त्यांना परवडणाऱ्या, सहजपणे स्वीकारल्या जाणाऱ्या आणि सरासरी लहान भारतीय शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्थानिक शेतीला उपयोगी ठरतील अशी कृषी साधने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या धोरणाद्वारे भारतातील शेतकऱ्यांच्या होणाऱ्या दुर्दैवी आत्महत्या थांबवल्या जाऊ शकतील.

# एसटीचे हायटेक कामकाज कागदावरच



**अंतरा पारंगे**

एसटी महामंडळाने हायटेक होत कागदी पासच्या जागी स्मार्ट कार्डची योजना राज्यात राबविली. महामंडळाचा हा कारभार फार वर्षे चालला नसल्याचे दिसून आले आहे. मागील तीन वर्षापासून स्मार्ट कार्डची योजना बंद पडली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह नियमीत एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कागदी पासचा आधार घ्यावा लागत आहे. स्मार्टकार्डची प्रतिक्षा कायमच असून, एसटीचे पासचे कामकाज कागदाच्या भरोवशावरच चालत आहे. त्यामुळे हे कामकाज हायटेक कधी होणार, असा प्रश्न सर्वसामान्यांकडून विचारला जात आहे.

ज्येष्ठ नागरिकांना एसटीतून प्रवास करताना, तहसील कार्यालयातील मिळणाऱ्या ज्येष्ठ नागरिक दाखल्याच्या आधारे एसटीची सवलत पुर्वी मिळत होती. त्यानंतर आधारकार्डमार्फत सवलत देण्यास सुरुवात केली. मात्र, हे कार्ड हाताळताना गहाळ होण्याची भिती अधिक होती. त्यात खराब होण्याची शक्यताही होती. एसटी महामंडळाने ६५ वर्षे पूर्ण असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र म्हणून स्मार्ट कार्ड देण्याचा निर्णय घेतला. बस आगारातील आरक्षण कक्षामध्ये त्यासाठी स्वतंत्र कार्यालय सुरु करण्यात आले. स्मार्टकार्ड नोंदणी केल्यानंतर एक ते दोन महिन्यानंतर स्मार्टकार्ड देण्याची व्यवस्था करण्यात आली. एसटी महामंडळाच्या या उपक्रमाला ज्येष्ठ नागरिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. एसटीचे स्मार्ट कार्ड दाखवून ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध झाली. तसेच एसटीतून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसह अन्य पासधारक प्रवाशांनादेखील स्मार्ट कार्ड देण्यास सुरुवात केली. कागदी पासच्या जागी स्मार्टकार्ड आल्याने विद्यार्थी व अन्य प्रवासीदेखील आनंदी झाले. आठ वर्षापुर्वी सुरु झालेली स्मार्टकार्ड योजना गेल्या तीन वर्षापासून बंद पडली आहे. ज्या कंपनीला स्मार्ट कार्ड तयार करण्याचे काम दिले होते. त्याच कंपनीच्या तांत्रिक कामांमध्ये बिघाड झाला. सर्व्हरची समस्या निर्माण झाली. त्यामुळे नव्याने स्मार्टकार्ड काढण्यास अडचण निर्माण झाली. मुदत संपलेल्या कार्डचे नुतनीकरणही करणे ही थांबले. २०१६ पासून स्मार्ट कार्ड योजना सुरु केली. एटीएम कार्डसारखे अद्ययावयत असे स्मार्ट कार्ड हेच विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक व अन्य पासधारकांसाठी एसटी बस पासमधील ओळखपत्र बनले होते ते ओळखपत्र स्कॅन केल्यावर नोंदणी मशीनमध्ये केली जात होती. मात्र स्मार्ट कार्ड मिळणे बंद झाले आहे. त्यामुळे सध्या आधारकार्ड व कागदी पासच्या भरोवशावरच विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करावा लागत आहे. अनेकदा लांब पल्ल्यासाठी जुन्या बस वापरल्या जातात. त्यामुळे रस्त्यातच बस बंद पडण्याचे प्रमाणही वाढत आहे. बस बंद पडल्यानंर दुसरी बस येईपर्यंत प्रवाशांना ताटकळत रस्त्यात उभे राहावे लागते. त्यामुळे प्रवाशांना अधिक वेळ लागत असून, मनस्तापदेखील सहन करावा लागतो आहे. स्टेअरिंगमध्ये बिघाड होणे, गिअर अडकणे, इंजिन ओव्हर हीट होणे, टायर फुटणे, स्टार्टरमध्ये बिघाड होणे आदी प्रकार नेहमीचेच झाले आहेत. तर बसमधील मोडक्या सीट, गाद्या फाटलेल्या असणे, फुटलेल्या खिडक्या, पत्रा तुटलेला असणे तसेच बसचा आवाजही प्रवाशाच्या कानाला सहन होणार नाही इतका असणे, अशा समस्या जुन्या बसमध्ये असतात. याचा प्रवाशांना नाहक त्रास सोसावा लागतो.

प्रवाशांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी एसटी महामंडळाचा प्रयत्न कायम राहीला आहे मात्र तो प्रयत्न फार काळ टिकत नसल्याचे ही खरे आहे. एसटीमध्ये काही वर्षापूर्वी वायफाय सेवा सुरू केली होती. या सेवेचा आनंद विद्यार्थ्यांसह प्रवाशांनी भरपूर घेतला. परंतू ही सेवा देखील फार काळ टिकली नाही. प्रवाशांना आरामदायी प्रवास करता यावा यासाठी शिवशाही बस आणली. वातानुकूलित बसमधून प्रवास करण्याचा आनंद प्रवासी आजही घेत आहेत. या शिवशाही बसला प्रवाशांकडून प्रचंड मागणी आहे मात्र, जिल्ह्यातील अलिबागसह काही आगारातील बसेसमधील एसीमध्ये बिघाड हा प्रश्न गंभीर बनला आहे. पनवेल ते अलिबाग विना थांबा प्रवास करताना एसीमध्ये बिघाड झाला होता. संपूर्ण बंद असलेल्या या बसमधील ए सी खराब झाल्याने घाम पुसत प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर आली होती. अनेकांना गुदरमल्या सारखे झाले होते. त्यामुळे प्रवाशांचा विचार होणे गरजेचे आहे.

लोकसंसद

## भारतीय लोकशाहीतील निवडणुक प्रक्रिया अबाधित ठेवणे गरजेचे....

महाराष्ट्रात नुकताच नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीसाठी मतदान संपन्न झाले मात्र राज्यांतील विविध भागांत मतदान प्रकियेला गालबोट लागल्याचे समोर आले आहे कुठे सत्ताधारी आमदारांनी आचारसंहितेचे उल्लंघन केले तर कुठे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींमध्ये जोरदार संघर्ष झाल्याचे पाहायला मिळाले नाशिक, बुलढाणा, सोलापूर, मुक्ताईनगर, अंबरनाथ, बीड, गेवराई, महाड, रायगड, धाराशिव आदी ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये हमरीतुमरी तर राजकीय पक्षांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडल्याने मतदानाला गालबोट लागल्याचे वृत्त आहे मतदानाच्या दिवशी ठिकठिकाणी मतदान केंद्रावर उमेदवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली काही ठिकाणी एकमेकांवर जीवघेणा हल्ला देखिल केल्याचे समोर आले आहे कुठे मशीन बंद पडली त्यामूळे पुन्हा थोडा गोंधळ उडाला या प्रकारामुळे पुन्हा एकदा कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे अधोरेखित झाले आहे याचं पार्श्वभुमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी असल्या वदांच्या घटनेमुळे दुःख आणि संताप व्यक्त केला असून अशा प्रकारचे वर्तन कदापी सहन केले जाणारं नसल्याचा इशारा दिला आहे. **राजू जाधव, मांगूर**

## वाढते शहरीकरण रोखा

खेड्याकडे चला असा नारा महात्मा गांधींनी देशवासीयांना दिला कारण त्यांच्यामते खरा भारत खेड्यातच आहे. त्यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत लाखो देशवासीय खेड्यात राहू लागले. आज मात्र नेमकी त्याच्या उलट परिस्थिती पहायला मिळत आहे. खेड्यातून शहरात स्थलांतर वाढले आहे. रोज हजारोंचे लोंढे खेड्यातून शहराकडे येत आहेत. अर्थात त्याला करणेही तशीच आहेत. लागवडीखालील जमीन घटत चालली आहे. शेती परवडत नाही. पिकाला हमी भाव नाही. मजुरी महाग होत चालली आहे. खेड्यात रोजगाराचा वानवा आहे त्यामुळे तरुण वर्ग शहरांकडे चालला आहे. शहरात स्थलांतर वाढल्याने शहरातील जमीनही कमी पडू लागली आहे. खेड्यातून शहरात होणारे स्थलांतर रोखण्यासाठी शासनाने खेड्यातच रोजगार उपलब्ध करून द्यायला हवेत. शासनाने पिकाला हमी भाव द्यायला हवा. जर खेड्यातच तरुणांच्या हाताला काम मिळाले तरच खेड्यातून शहरात होणारे स्थलांतर थांबेल. **श्याम ठाणेदार**

दिनविशेष

# श्री दत्त जयंती कथा

मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी दत्ताचा जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांत साजरा होत असती. दत्त जयंती या दिवशी दत्ततत्व है पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते. दत्तजन्म कथा: अतिशय महान तपस्वी अत्री ऋषी यांची पत्नी अनुसूया अतिशय सद्गुणमंडित होती. तिच्या पतिव्रतेची चर्चा थेट इंद्रलोकात होऊ लागली. तत्कालीन व्यवस्थेनुसार ज्याचे पुण्य जास्त त्याला इंद्रपद मिळत असे. अनुसूयेच्या पतिव्रतेचे तेज पाहून इंद्रदेवाला भीती वाटू लागली. त्याने तिनही देवांकडे धाव घेतली आणि आपले इंद्रपद धोक्यात आहे असे सांगितले. योगायोगाने तिनही देव कैलासावर एकत्र जमले होते. इंद्रदेव तिथे पोहोचले आणि त्यांनी आपली व्यथा तिघांसमोर मांडली.

तीनही देवांबरोबर त्यांच्या सुविद्य पत्नीदेखील तिथे उपस्थित होत्या. एका स्त्रीसमोर दुसऱ्या स्त्रिचे कौतुक कोणत्याही स्त्रिला सहन होत नाही. अनुसूयेचे कौतुक ऐकताच, तिघींनी कान टवकारले. कोण आहे ती, हे जाणून घेण्यासाठी नारदाला बोलावून घेतले. तीनही देवस्त्रियांची उत्सुकता पाहून नारद महर्षी अनुसूयेचे आणखीनच रसभरित वर्णन करू लागले. तिघींचे रागरंग बदलू लागले. एका क्षणाला त्यांनी नारदाला हटकले व म्हणाल्या, मपुरे झाले कौतुक. आम्हा तिघींपैकी कोणी स्त्री या विश्वात श्रेष्ठ असूच शकत नाही.फ यावर नारद म्हणाले, मठीक आहे, घ्या तिची परिक्षा!फतिघी एकासूरात मघेणारचफ असे म्हणाल्या आणि तिघींनी त्रिदेवांकडे कटाक्ष टाकला. तिघींनी फर्मान सोडले, मआता ताबडतोब जा आणि कोण अनुसूया आहे, तिची परीक्षा घ्या.फ त्रिदेवांनी समजूत काढली, पण कोणी ऐकायला तयार होईना. बायकोचा हट्ट पुरवावा लागणार अशी चिन्हे दिसू लागल्यावर, भगवान विष्णूंनी ध्यान लावून पाहिले. अत्रि ऋषी आश्रमात नाहीत, हीच वेळ जाण्यासाठी योग्य आहे, अन्यथा कितीही वेशांतर करून गेलो, तरी ते आपल्याला निश्चित ओळखतील, हे विष्णूंना ठाऊक होते. त्रिदेव जाण्यासाठी निघाले, तोच त्यांच्या पत्नी म्हणाल्या, मसाधी परीक्षा नाही, सत्वपरीक्षा घ्या!फदेवींना काय सुचवायचे आहे हे लक्षात घेऊन त्रिदेव अलख निरंजन म्हणत साधूंच्या वेषात अत्रि ऋषींच्या आश्रमाबाहेर आले. अतिथींचा आवाज ऐकताच अनुसूया जोंधळे घेऊन अन्नदान करायला बाहेर आली. त्या तेज:पूंज अतिथींना पाहून स्तिमीत झाली. ती दान देणार, तेवढ्यात विष्णूंनी तिला विवस्त्र होऊन अन्न द्यावे, अशी मागणी केली. एका पतिव्रतेकडे अशी मागणी करण्याचे धाडस कोणत्या साधूंमध्ये असावे? असा विचार करत अनुसूयेने अत्रि ऋषींचे स्मरण केले. तिला अतिथी धर्म चुकवायचा नव्हता, तसेच विवस्त्र होऊन पातिव्रत्यही भंग होऊ द्यायचे नव्हते. या समस्येचा मध्य काढताना अनुसूया मनातल्या मनात म्हणाली, अशी मागणी करणारे सामान्य साधू नाहीत. त्यांच्या इच्छापूर्तीसाठी मी विवस्त्र होईन, पण त्यांनीदेखील माझे बाळ झाले पाहिजे, कारण त्यांनी भिक्षा मागताना माझा उल्लेख माते असा केला होता.फ अशा विचाराने तिने आपल्या पतीचरणांचे उदक घेऊन अतिथींवर शिंपडले आणि तिच्या तपसामर्थ्याने ती तिघेही बालके झाली. त्यांना पाहून अनुसूयेचा वात्सल्याने ऊर भरून आला. तिने शर्थ पूर्ण केली आणि बालकांचे पोट भरल्यावर पाळणा बांधून झोपवले. अत्रि ऋषी परत आल्यावर तिने सगळी हकीकत सांगितली.स्वर्गलोकात तिनही देवस्त्रिया पतीची वाट पाहू लागल्या. नारद महर्षींनी सर्व वृत्त कथन केले. आपले पती आता मोठे झाल्यावर परत येणार हा विचारच त्यांना सहन झाला नाही. अनुसूयेच्या पतीव्रतेसमोर तिघी जणी नतमस्तक झाल्या. आपला अहंकार दूर ठेवून त्या अनुसूयेला शरण आल्या आणि आपला पती परत मागू लागल्या. अनुसूयेने पती चरणोदक शिंपडून बाळांना पूर्ववत केले परंतु तिचा पाळणा रिकामा झाला. तेव्हा, तिच्यावर प्रसन्न होऊन तीनही देवांनी अनुसूयेच्या उदरी जन्म घेणार असा आशीर्वाद दिला. त्यानुसार मार्गशीर्ष पौर्णिमेला सूर्यास्ताच्यावेळी (सायंकाळी ६.४०) दत्तात्रेयांचा जन्म झाला. ब्रह्मदेवांचा अंश चंद्र, विष्णूंचा अंश दत्तात्रेय आणि शंकराचा अंश दूर्वास अशी तिनही बालके अनुसूयेच्या आणि अत्रि ऋषींच्या छत्रछायेत वाढू लागली.दत्तजन्म जन्मवेळ : म्हणून आजही मार्गशीर्ष पौर्णिमेला सायंकाळी ६.४० रोजी दत्त जन्म घोषित करतात आणि भजन, कथा, कीर्तन करून उत्सव साजरा करतात.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# बेकायदेशीर उद्योगांचा सुळसुळाट

## ● नामांकित कंपन्यांचे नाव वापरून बनावट उत्पादने; लाखोंचा माल जप्त




**। वसई । प्रतिनिधी ।**

वसई-विरार शहरात गेल्या काही काळात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम उभे राहिले आहे. ही अनधिकृत बांधकामे बेकायदेशीर व्यवसायांसाठी केंद्र ठरु लागली आहेत. वसई पूर्वेतील एका गोदामात विविध नामांकित कंपन्यांचे नाव वापरून बनावट घरगुती उत्पादने तयार करून त्याची विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसई पूर्वेच्या भागात कामण देवदळ परिसर आहे. मागील काही वर्षात या भागात विविध प्रकारचे कारखाने उभे राहिले आहेत. तर याच कारखान्यातील गाळ्यांमध्ये बेकायदेशीर व्यवसाय केले जात असल्याचे प्रकार उघडकीस येत असताना याच भागातील ममता कंपाऊंड येथील गाळ्यात नामांकित कंपन्यांचे नाव व लोगो वापरून बनावट उत्पादने तयार केली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

फिल्ड मॅनेजर म्हणून कार्यरत असणारे शितलकुमार झा यांच्या निदर्शनास हा प्रकार आला होता. गुरुवारी दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनंतर सोमवारी नायगाव पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांकडून अनधिकृत गाळ्याच्या ठिकाणी छापा टाकून बनावट माल जप्त केला. यात हँडवाश, टूथपेस्ट, जंतुनाशक, साफसफाईसाठी वापरण्यात येणारे फिनाईल, भांडी घासण्याचा साबण, केसांना लावण्याचे तेल असा बनावट माल, नामांकित कंपनीच्या नावाचे आणि लोगोचे स्टिकर, हुबेहूब दिसणाऱ्या उत्पादनांच्या बनावट बाटल्या व बुचं असा ८ लाख ८० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधितांवर कॉपीराईट कायदाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. बनावट उत्पादने बाजारात कशी आली? यामागे नेमकी कोणती टोळी सक्रिय आहे? याबाबतही पोलीस तपास करत आहेत.

### या कंपन्यांच्या उत्पादनाचा समावेश

**बनावट उत्पादन प्रकरणी नायगाव पोलिसांनी केलेला कारवाईत डाबर इंडिया – १ लाख १४ हजार ३०० रुपये, रॅकीट– ४ लाख ८९ हजार १४४ रुपये, हिंदुस्थान युनिलिव्हर– २ लाख ३५ हजार ९९५ रुपये तसेच गोदरेज – ४० हजार असा एकूण ८ लाख ८० हजार ३३४ इतका माल जप्त करण्यात आला आहे.**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### ४ डिसेंबर

१) श्री.महादेव राघव शेळके
मु.वेश्वी, अलिबाग
४-१२-१९५२

२)श्री.अमृतराव तुकाराम थोरात
दळीनगर, वेश्वी, अलिबाग
४-१२-१९५०

३)डॉ.किरण वासुदेव नाबर
वरसोली-अलिबाग
४-१२-१९६८

## लीलावती पाटील यांचे निधन

**। भाकरवड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कमलपाडा गावच्या लीलावती प्रभाकर पाटील यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी रविवार दि.३० नोहेंबर रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण कमलपाडा, देहेन पंचक्रोशीवर शोकांतिका पसरली आहे. अत्यंत प्रामाणिक, शांत, मितभाषी आणि सर्वांशी मिळून मिसळून राहणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्या पार्थिवावर कमलपाडा गावाच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ, मित्रपरिवार उपस्थित होते. लीलावती पाटील यांच्या पश्चात पती प्रभाकर पाटील, दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवार दि. ९ डिसेंबर रोजी, तर तेरावे शुक्रवार दि. १२ डिसेंबर रोजी देहेन येथे होणार आहेत.



# मुरुडमध्ये तंबाखूमुक्त युवा अभियान

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा रुग्णालय जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल घुगे, मुरुड ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. उषा चोले यांच्या मार्गदर्शनाखाली अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना गट शिघ्रे आणि मेहबूब इंग्लिश स्कूल विहूर येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तंबाखूचे दुष्परिणाम विषयी माहिती देण्यात आली आणि तंबाखूमुक्ती शपथ घेण्यात आली.



ग्रामीण रुग्णालयातील दंत शल्यचिकित्सक डॉ. शेखर वानखेडे, अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फीरोज शेख, विहूर येथील मेहबूब इंग्लिश स्कूल अधिव्याख्याता मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सन २०२३ पासून देशातील तरुणांसाठी तंबाखूचा वापर रोखण्यासाठी व सोडविण्यासाठी तंबाखूमुक्त युवा मोहिम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच भाग तंबाखूमुक्त युवा अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना तंबाखूचे दुष्परिणाम आणि तोंडाचा कर्करोग याबाबत माहिती देऊन तंबाखूमुक्त शपथ दिली.

# दोन तरुणांवर जीवघेणा हल्ला

## एकाचा मृत्यू

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

दिवा शहरात परप्रांतीय अल्पवयीन मुलासह एका टोळक्याकडून दोन तरुणांवर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात अभिषेक पाटील (२२) याचा मृत्यू झाला असून सुमित गावडे (२२) हा गंभीर जखमी आहे. ही घटना गणेश नगर, गणेश पाडा, दिवा पूर्व येथे रात्री सुमारे ९.१५ वाजता घडली. गेल्या महिनाभरातील अशी ही दुसरी घटना असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुख्य आरोपी ऋतिक दुबे हा अल्पवयीन असून त्याच्यासह एकूण ७ ते ८ जणांनी या दोघांवर धारदार शस्त्राने हल्ला केला. गंभीर जखमी झालेल्या अभिषेकला तातडीने कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात नेले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. तर सुमित गावडे याच रुग्णालयात उपचाराधीन आहे. याप्रकरणी काही आरोपी फरार असून ऋतिक दुबेसह ७ ते ८ जणांना दिवा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हे प्रकरण मुंब्रा पोलीस स्टेशन हद्दीत नोंदवण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. दिव्यात परप्रांतीय गुन्हेगारांच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.




# विसरलेला लॅपटॉप प्रवासी तरुणीला परत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

खोपोलीजवळील बीड बुद्रुक गावातील महिला प्रवासी उपनगरीय लोकलमध्ये विसरलेली सॅक आणि त्यात असलेला ४० हजार रुपये किमतीचा लॅपटॉप रेल्वे पोलिसाना आढळून आला. त्याबाबत महिला प्रवासी यांना संपर्क करून सदर लॅपटॉप प्रवाशाला परत देण्यात आला आहे.

२३ नोव्हेंबर रोजी कर्जत येथे आलेल्या खोपोली लोकलमध्ये एक बॅग सेवेत असलेल्या रेल्वे महिला पोलीस यांना महिला डब्यात एक सॅक आढळून आली. या महिला पोलीस कर्मचारी यांनी ही बॅग ठाणे अंमलदार यांच्या कार्यालयात आणली. तेथे कर्जत पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार जितेंद्र जाधव यांच्या समक्ष आणि सीसीटीव्ही कॅमेरा यांच्या निगराणीखाली सदर बॅग उघडून पहिली असता त्यात एक एचपी कंपनीचा लॅपटॉप आढळून आला. तसेच त्यासोबत असलेलया कागदपत्रात त्या महिला प्रवासी यांचा मोबाईल नंबर आढळून आल्याने पोलिसांनी महिला प्रवासी यांना संपर्क केला. संबंधित सॅकमधील लॅपटॉप खालापूर तालुक्यातील बीड बुद्रुक गावातील सलोनी राजाभाऊ गाडेकर यांची असल्याचे निष्पन्न झाले. शिक्षण घेत असलेल्या तरुणीला संपर्क केल्यावर ती कर्जत रेल्वे पोलीस ठाणे येथे पोहचली. संबंधित तरुणीकडे असलेली कागदपत्र आणि ओळख पत्र यांची खातरजमा करून कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला प्रवासी यांना परत देण्यात आली. महिला प्रवासी यांना परत देण्यात आलेल्या लॅपटॉपची किंमत ४० हजार रुपये आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यात महिला जखमी

**संगमेश्वर :** संगमेश्वर तालुक्यातील शिवने सनगरेवाडी येथे महिलेवर बिबट्याने हल्ला केला. महिलेने धाडसाने प्रतिकार करत आपला जीव वाचवला. मात्र, हल्ल्यात महिला जखमी झाली. जखमी साक्षी मंगेश पवार (३८) या लाकडे गोळा करण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. त्याच्या पायावर चार नखे लागली आहेत. पवार यांनी धाडसाने प्रतिकार करत जीव वाचला. दिवसागणिक बिबट्याचे हल्ले वाढू लागले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण आहे.




**पनवेल जिल्हा रुग्णालय आणि लोकअदालत यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये जनजागृती रॅली काढण्यात आली. यामध्ये एड्स विरुद्ध जाणीव, सावधानता आणि सुरक्षिततेचा संदेश देण्यात आला. तसेच, 'जागरूकता हीच संरक्षण, निरोगी जीवनाची दिशा' असा संदेश देत अधिकारी, डॉक्टर्स आणि महिला वर्ग सहभागी झाले होते. समाजातील प्रत्येकापर्यंत योग्य माहिती पोहोचवण्याचा निर्धार या रॅलीतून व्यक्त करण्यात आला. (छायाचित्र – राजेश डांगळे)**

# शिवशांती स्नेहालयतर्फे आरोग्य शिबीर

## ५० हून अधिक ज्येष्ठांनी घेतला लाभ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शिवशांती स्नेहालय सेवाभावी संस्था नियोजित वृद्धाश्रम व विरंगळा केंद्र, वाडगाव, यांच्यातर्फे रविवार, दि.३० नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता भारती दीनानाथ तरे सभागृह, अलिबाग येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अस्थिरोग तज्ञ डॉ. चंद्रशेखर साठ्ये यांच्या सहकार्याने हे शिबीर पार पडले. शिबिरार्थींना सकाळी आठ वाजल्यापासून ज्येष्ठांनी आपला दिनक्रम कसा सुरू करावा, यासाठी सकाळी उठल्यापासूनचे व्यायाम, चालणे व दिवसभराचा पौष्टिक आहार कोणता असावा, याचे प्रशिक्षण देण्यात आले.




डॉ. चंद्रशेखर साठ्ये यांनी आपल्या व्याख्यानात हाडांची घनता, अस्थिभंग, त्यासाठी घ्यावयाची दक्षता व त्यावरील उपचारांबाबत सविस्तर माहिती दिली. तर लायन्स हेल्थ फाऊंडेशन, अलिबाग यांच्यामार्फत डोळ्यांची तपासणी करण्यात आली. चोंढी येथील लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या डोळ्यांच्या हॉस्पिटलच्या मुख्याधिकारी डॉ. शुभदा कुरतडकर व त्यांच्या सहकारी डॉक्टर्स आणि तंत्रज्ञ यांनी तपासणी व उपचार केले. याव्यतिरिक्त डॉ. अपूर्वा कुलकर्णी, डॉ. प्रतिभा पाटील, डॉ. सुभाष म्हात्रे यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना औषधी दिली. डॉ. अपूर्वा कुलकर्णी यांनी उतार वयातील आहार व आजार, तसेच त्यावरील उपचार व व्यायामाची माहिती दिली. शिबिरात हाडांची घनता तपासणी, थायरॉईड व एचबी सारख्या चाचण्याही करण्यात आल्या. सुमारे ५० हून अधिक शिबिरार्थींवर या शिबिरात उपचार करण्यात आले.

## अनुयायांसाठी सोयीसुविधांची चोख व्यवस्था | निवासी मंडपांत १० ठिकाणी एलईडी स्क्रीन

# महापरिनिर्वाण दिनासाठी महानगरपालिका सज्ज

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका सज्ज झाली आहे. पालिकेने चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान राजगृह यासह आवश्यक त्या विविध ठिकाणी नागरी सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. अनुयायांसाठी जलप्रतिबंधक निवासी मंडप, धूळ प्रतिबंधक आच्छादन, प्रसाधनगृहे, पिण्याचे पाणी, सुरक्षा व आरोग्यविषयक सेवा-सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. यासाठी ८ हजारांहून अधिक कामगार, कर्मचारी, अधिकारी कर्तव्यतत्पर असणार आहेत. चैत्यभूमीतील आदरांजलीचे मोठ्या पडद्यांवर व महानगरपालिकेच्या विविध समाजमाध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

मुंबईत येणाऱ्या अनुयायांसाठी चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान व अन्य ठिकाणी आवश्यक नागरी सेवा-सुविधांची पूर्तता करण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी यापूर्वीच दिले आहेत. या अनुषंगाने, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनात, उपायुक्त प्रशांत सपकाळे, जी उत्तर विभागाचे सहायक आयुक्त विनायक विसपुते यांच्या नेतृत्वात विविध सोयी-सुविधांची पूर्तता केली जात आहे. पूर्वतयारीबाबत अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) येथे १ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर जलप्रतिबंधक (वॉटरप्रूफ) निवासी मंडपाची व्यवस्था करण्यात आली आहे. निवासी मंडपांत १० ठिकाणी एलईडी स्क्रीन लावल्या आहेत. ३० हजार चौरस मीटर क्षेत्रफळाच्या पायवाटांवर धूळ प्रतिबंधक आच्छादन केले आहे. तर, मैदानाभोवती १ हजार मीटर लांबीचे तात्पुरते कुंपण लावले आहे. परिसरात स्वच्छतेसाठी ५२७ कामगार विविध संयंत्रांसह प्रत्येक सत्रात कार्यरत असतील. दर्शन रांग व मुख्य मार्गांवर एकूण १५० फिरती शौचालये, अभिवादन रांगेत १०, मैदान परिसरात २५४ शौचालये, महिलांसाठी पिंक टॉयलेट्सची तसेच नळ व शॉवर सुविधेसह २८४ तात्पुरत्या स्नानगृहांची व्यवस्था केली आहे. २० रुग्णवाहिका, डेंगी व हिवताप (मलेरिया) बाबत जनजागृतीसाठी कक्ष, आरोग्य तपासणी व औषधोपचार आदी वैद्यकीय व्यवस्था करण्यात आली आहे. वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी ५८५ एवढ्या संख्येने तज्ज्ञ मनुष्यबळ कार्यरत असेल.

उपायुक्त (परिमंडळ-२) श्री. प्रशांत सपकाळे म्हणाले की, सुरक्षेच्या अनुषंगाने, सीसीटीव्ही कॅमेरे, फिरते कॅमेरे व मेटल डिटेक्टर्स, बॅग स्कॅनर्स आदींसह नियंत्रण कक्ष, माहिती कक्ष व निरीक्षण मनोऱ्यांची उभारणी केली आहे. अग्निशमन वाहने, अतिदक्षता रुग्णवाहिका, दादर चौपाटी येथे बोट आदींची व्यवस्था केली आहे. भ्रमणध्वनी (मोबाईल) चार्जिंग सुविधा व संपूर्ण परिसरात विद्युत रोशणाई करण्यात आली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी २५४ नळांसह १६ टँकरची व्यवस्था असून अनुयायांसाठी बिस्किट व भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष उभारले आहेत, अशी माहितीदेखील सपकाळे यांनी दिली आहे.

अनुयायांनी या सेवा-सुविधांचा लाभ घ्यावा. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई पोलिस दल आदींकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# निवडक

## मच्छीविक्रेत्यांना आर्थिक फटका

**रत्नागिरी :** थंडीचा मोसम सुरू झाला असला तरी जिल्ह्यात मासळी बाजारात निराशाजनक चित्र आहे. नवीन हंगाम सुरू होऊन चार महिने लोटले तरी बदलत्या हवामानासह इतर कारणांमुळे माशांची आवक मोठ्या प्रमाणावर घटली आहे. त्याचा फटका मच्छीमारांना बसत आहे. पूर्वी किनारपट्टी भागात सुरमई, मोडोसासारख्या माशांची मुबलक उपलब्धता असायची. मात्र आता या प्रजाती दुर्मीळ झाल्या आहेत. सध्या मार्गशीर्ष महिना सुरू झाल्यामुळे या महिन्यात मच्छीला मागणी कमी होणार आहे. त्यामुळे कमी माल येऊनही अपेक्षित उठाव होत नसल्याने मच्छीविक्रेत्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. किनारपट्टीवर वाढलेले जलप्रदूषण, अनियंत्रित मासेमारी व त्यांच्या प्रजननकाळात होणारी मासेमारी ही कारणे पुढे आली आहेत. खोल समुद्रात मासेमारी करूनही अपेक्षित मासे जाळ्यात सापडत नाही. त्यामळे मच्छीमारांना मासेमारीसाठी होणारा डिझेल आणि मनुष्यबळांचा खर्चही काढणे कठीण झाले आहे.



## खुर्द सकलप येथे पाराचे उद्घाटन



**म्हसळा :** खारगाव खुर्द सकलप येथे ग्रामस्थांच्या सोयीसाठी आणि परिसराच्या सौंदर्यासाठी पार (चौथरा) उभारण्यात आला आहे. या पार बांधकामाचे उद्घाटन गट विकास अधिकारी माधव जाधव यांच्या हस्ते झाले. हा सोहळा माजी सभापती महादेव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. दिघीपुणे राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या दोन वडाच्या झाडांभोवती छोटेखानी पण उपयुक्त असा सुबक पार उभारण्यात आला आहे. ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध छोट्या निधीतून केलेले हे काम नागरिकांच्या सोयीसाठी अत्यंत उपयोगी ठरत आहे. गावाच्या दृश्यसौंदर्यात भर घालणारे हे बांधकाम सर्वांच्या दृष्टीक्षेपात असल्याने ग्रामस्थांकडून विशेष कौतुक होत आहे. वडाचे झाड हा हिंदू संस्कृतीतील आस्था, परंपरा आणि पवित्रतेचा प्रतीक असल्याने येथील पार महिलांना वटपौर्णिमेच्या दिवशी पूजा करण्यासाठी तसेच वाटसरू, प्रवासी व पर्यटकांनाही निवांत विश्रांती घेण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने पूर्ण झालेल्या या बांधकामाचे सर्वत्र कौतुक होत असून गावाच्या विकासाला नवी दिशा देणारे हे उपयुक्त काम ठरत आहे.

## बस ट्रॅकर ॲप सेवा कोलमडली

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेची (एनएमएमटी) बस ट्रॅकर ॲपची सेवा तांत्रिक कारणांमुळे काही दिवसांपासून बंद पडली आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला तोंड द्यावे लागत आहे. आयटीएमएस सर्व्हरमध्ये अचानक निर्माण झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे ही सेवा ठप्प झाल्याचे एनएमएमटी प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या ॲपचे सॉफ्टवेअर कालबाह्य होत आले आहे. तसेच संबंधित कंपनीचे कंत्राटही संपुष्टात आले आहे.आधीच अपुऱ्या बसअभावी प्रवाशांना नाहक त्रास सोसावा लागत असताना कशीतरी चालू असलेली ही बस ट्रॅकर ॲप सेवाही आता कोलमडली आहे. एनएमएमटीच्या आयटीएमएस प्रणालीखाली ही सेवा कार्यरत असून, बसचे लोकेशन, मार्गावरील स्थिती व आगमन वेळ याबाबतची माहिती या ॲपवरून मिळते. ॲप बंद झाल्याने ही सर्व माहिती प्रवाशांना मिळणे थांबले असून प्रवाशांना थेट बसथांब्यावर जाऊन बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. याबाबत महापालिकेच्या परिवहन विभागाने दिलेल्या निवेदनात, सर्व्हरमधील तांत्रिक समस्या दूर करण्याचे काम सुरू असून ॲप लवकरच सुरळीत कार्यान्वित केला जाईल, असे कळवले आहे.

## वारकरी संस्कृती रक्षक : महेंद्र घरत



**पनवेल ग्रामीण :** महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि वारकरी हे या भूमीचे पाईक आहेत. त्यामुळे वारकरी हा माझा श्रद्धेचा विषय आहे. आषाढी-कार्तिकीला पंढरपूरला गेल्यानंतर जे समाधान मिळते ते छान असते. वारकरी बांधव हे संस्कृती रक्षक आहेत. त्यांच्या भजन-कीर्तनाच्या परंपरेने महाराष्ट्राचे नाव जगात अभिमानाने घेतले जाते. पाय जमिनीवर ठेवून मातीशी घट्ट नाते असलेल्या वारकऱ्यांचे योगदान महाराष्ट्र या संत भूमीत अनन्यसाधारण आहे, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले. मंगळवारी (दि.२) मोहोपाडा येथे म्हणाले. वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ, रसायनी, पाताळगंगा, खालापूर, पनवेल परिसर अखंड हरिनाम सप्ताह जनता विद्यालय मोहोपाडा, रसायनी येथे सुरू आहे. हा सप्ताह गेली १२ वर्षे अखंड चालू असून महेंद्र घरत त्यांना दरवर्षी ५१ हजार रुपयांचे साह्य करतात. यावर्षीही त्यांनी त्यांच्याकडून ५१ हजार रुपयांचे साह्य करण्यात आले.

## कर्तव्यासोबत मानवतेचे दर्शन

**रत्नागिरी :** रोहा नगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. मंगळवारी सकाळपासूनच सर्व मतदान केंद्रांवर मतदारांची गर्दी पाहायला मिळाली. ज्येष्ठ नागरिक आणि अपंग मतदारांसाठी विशेष सोयीसुविधांचीही व्यवस्था करण्यात आली होती. मतदान केंद्रावर तैनात असलेल्या पोलिस सहाय्यक निरीक्षक सूर्या पवार यांनी मानवतेचे मोठे उदाहरण घालून दिले. मतदानासाठी आलेल्या एका अपंग ज्येष्ठ नागरिकांस मतदानकक्षापर्यंत पोहोचवत, त्यांनी आपली कर्तव्यनिष्ठा आणि माणुसकी दोन्ही सिद्ध केली. या घटनेचे उपस्थित सर्वांनी कौतुक केले असून निवडणूक कर्तव्य बजावताना दाखवलेली त्यांची संवेदनशीलता आणि मदतशील वृत्ती अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



# शांतीनिकेतन शाळेतील विद्यार्थ्यांची फी माफ

## ■ शेकाप नेते राजेश केणी यांच्या पाठपुराव्याला यश, राज्यात सर्वात जास्त प्रवेश देणारा तालुका

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल येथील शांतिनिकेतन विद्यालयात आरटीई अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांच्या पालकांना मागणी झालेल्या ॲक्टिव्हिटी फी संबंधीची समस्या अखेर मार्गी लागली आहे. शेकाप तालुका चिटणीस राजेश केणी यांच्या पाठपुराव्यामुळे शाळा प्रशासनाने चालू वर्षातील फी माफ करण्यास तसेच पुढील वर्षापासून फी ऑप्शनल ठेवण्यास सहमती दर्शविली आहे.



पालकांनी या संदर्भात मागील आठवड्यात केणी यांच्या समवेत गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेतली होती. त्यानंतर सोमवार, १ डिसेंबर रोजी शांतिनिकेतन स्कूल येथे प्राचार्य सीमा, केणी, गटशिक्षणाधिकारी सकपाळ, माजी पंचायत समिती सदस्य स्वप्नील गिते तसेच पालकप्रतिनिधी व पत्रकारांच्या उपस्थितीत सकारात्मक चर्चा पार पडली. चर्चेनंतर शाळा प्रशासनाने या वर्षीची ॲक्टिव्हिटी फी संपूर्ण माफ करण्याच मान्य केल आहे. तर पुढील वर्षी फी ऑप्शनल ठेवण्याचे आश्वासन दिल आहे. त्याच प्रमाणे आठवीतून नववीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेश फी आकारली जाणार नसल्याचे मान्य करताना ९ वीपासून ट्युशन व ॲक्टिव्हिटी फी आरटीई विद्यार्थ्यांसाठी लागू होईल अशी माहिती देण्यात आली. केणी यांनी उपसभापती असल्याच्या कारकीर्दीमध्ये जिल्हा परिषदेतील शाळांना डिजिटल करण्याचे काम त्यांनी केले होते. सोबत अनेक अंगणवाड्या डिजिटल होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते.

शासनाकडून आरटीइ २५ टक्के कायदा चालू झाल्यानंतर पनवेल तालुक्याला सलग दोन वर्ष राज्यातील सर्वात जास्त आरटीई अंतर्गत प्रवेश देणारा तालुका म्हणून केणी यांचे विशेष प्रयत्न होते. त्यांचे सामाजिक कार्य विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातील कार्य लाख मोलाचे असल्याने पालकांनी केणी यांची खांदेश्वर भेट घेतली होती. केणी यांनी संयमी व परिणामकारक संवाद साधत पालकांची समस्या निकाली काढली. या निर्णयामुळे आरटीई विद्यार्थ्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळाला असून, पालकांनी शेकाप नेते राजेश केणी यांचे आभार मानले आहेत.

# निवडक

## बाळसई दत्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**सुकेळी** : बाळसई ता. रोहा येथे गुरुवार (दि.४) डिसेंबर २०२५ रोजी श्रीदत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने दिवसभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. यावर्षी या मंडळाचे



२७ वे वर्षे आहे. या कार्यक्रमाची सुरुवात (दि.४) रोजी सकाळी १० वाजता प्रविण जोशी यांच्या मंत्रविधीने होम करण्यात येईल. त्यानंतर सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास श्रीदत्त जन्म सोहळा साजरा झाल्यावर दत्त पादुकांची संपूर्ण बाळसई गावातुन पालखी मिरवणूक सोहळा पार पडणार आहे. पालखी मंदिरात आल्यानंतर श्रीदत्त प्रसन्न मंडळ बाळसई यांच्यातर्फे आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसाद देण्यात येईल. रात्री ९.३० वाजता विशाल यादव यांच्या सुश्राव्य किर्तनाने या कार्यक्रमाची सांगता होईल. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीदत्त प्रसन्न मंडळ, ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ बाळसई मेहनत घेत आहेत.

## नागोठणे रामनगरमध्ये पालखी सोहळा

**नागोठणे** : नागोठण्यातील रामनगर येथील श्री साई मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ रामनगर यांच्यावतीने श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळ्याचे आयोजन गुरुवार (दि.४) डिसेंबर रोजी दत्त जयंतीच्या दिवशी करण्यात आल्याची माहिती श्री साई मित्र मंडळाकडून देण्यात आली. श्री साईबाबा प्रतिष्ठापनेच्या २४ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने रामनगर येथे श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळा साजरा करण्यात येणार आहे. रामनगरमधील श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळ्याच्या निमित्ताने श्री साई मंदिरात गुरुवार (दि.४) डिसेंबर रोजी साजरा होणाऱ्या श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळ्याची सुरुवात सकाळी ८.३० वाजता शुभम गुप्ता दांपत्याच्या हस्ते होणार आहे. सकाळी ९.३० वा. ध्वजपूजन होणार आहे. सायंकाळी चार वाजता श्री साईबाबांचा पालखीची सुरू होणार आहे. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास समारोप होणार आहे. पालखी सोहळा यशस्वी होण्यासाठी शेखर गोळे, शुभम गुप्ता, सुरज तुरे, जितेंद्र कजबजे, निखिल पानकर, सुरज वर्मा, चेतन भिंगारे, अक्षय भिंगारे, अनिकेत बेलोसे, गजानन खंडारे आदींसह श्री साई मित्र मंडळ व उत्सव समितीचे पदाधिकारी, सर्व सदस्य, रामनगर ग्रामस्थ व युवक मंडळ, साई क्रिकेट क्लब रामनगर तसेच रामनगर महिला मंडळ मेहनत घेत आहेत.



## सुहृद मोरेंना राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार जाहीर

**सोगाव** : अलिबाग तालुक्यातील मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील मुशेत गावचे सुहृद आशा श्रीकांत मोरे यांना नुकताच केंद्र सरकार तर्फे राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार सोहळा २३ डिसेंबर २०२५ रोजी दिल्ली येथे होणार असून त्यांना राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते पुरस्कार देऊन त्याना गौरविण्यात येणार आहेत. सुहृदचे १० वी पर्यंतचे शिक्षण अलिबागमध्येच झाले आहे, त्यानंतरचे त्यांने पुढील विज्ञानाचे शिक्षण पुणे, जर्मनी, शिकागो, जपान, अमेरिका, चीन, नेदरलँड अशा विविध देशातील ठिकाणी झाले आहे. राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगावतर्फे त्यांच्या मुशेत येथील निवासस्थानी जाऊन अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी श्री क्लासेसचे संस्थापक संतोष राऊत, अशोक नाईक, विजय भगत, मजीद कुर, दत्तात्रय राऊत, उत्तम राऊत, चंद्रशेखर सुर्वे, मंगेश सुतार, गितेश करळकर, राजेंद्र करळकर, तेजस काठे, सुतेज लबदे, रुपेश निर्गुण, सुनील अनमाने, मुदस्सर कुर, निखिल करंजूकर, महेश सावंत, शफी वाकनीस आदी उपस्थित होते.



## भिलजीत रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**अलिबाग** : निरंकारी सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन कृपाशीर्वादाने संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनतर्फे संत निरंकारी भवन भिलजी येथे रविवार (दि.३०) नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबीर उत्साही वातावरणात संपन्न झाले. सदर शिबिरात परिसरातील एकूण १३५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. जिल्हा शासकीय रक्तपेढी अलिबाग यांनी रक्त संकलन केले. रक्तदान शिबिराचा शुभारंभ संत निरंकारी मंडळाचे रायगड क्षेत्राचे सेवादलाचे क्षेत्रीय संचालक प्रवीण पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी अनिल सकपाळ, जिल्हा रक्तपेढी संक्रमण अधिकारी डॉ. भैरवी मंदाडकर तसेच भिलजी गावातील ग्रामस्थ व अनेक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी या शिबिरास सदिच्छा भेट देवून संत निरंकारी मिशनच्या कार्याचे कौतुक केले, तसेच मिशनच्या सामाजिक योगदानासाठी शुभेच्छा दिल्या. आलेल्या सर्व रक्तदात्यांचे व मान्यवरांचे आभार सुरेश गावंड यांनी मानले.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **नागाव येथे घरी राहून** कामासाठी कपलची आवश्यकता आहे. कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम, गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल. सुविधा :केअरटेकर रूम, किचन काउंटर, टीव्ही. पगार : रु २५,००० /- प्रति महिना. अधिक माहितीसाठी संपर्क : 7875866555, 8408829555

● **विकणे आहे** - अलिबाग-कुरुळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क :९६२३८४९३४९

● कॉम्प्युटर ग्राफीक्स डियायनर, डिटीपी ऑपरेटर व मशिनवर काम करण्यासाठी मुले/मुली पाहिजेत. स्लॅष ग्राफिक्स, अलिबाग ९८२३६५०५५१

● कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९

● अलिबागमध्ये 2 BHK फ्लॅट विकत हवे. ९९७०४७३९२२.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## नेरळमधील श्री गुरुदत्त मंदिराचा वर्धापन दिन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ गावातील चिंचआळी भागातील रहिवाशी यांनी एकत्र येऊन लोकसहभागातून श्री गुरुदत्त मंदिराची होती. या मंदिराचा २८ वा वर्धापन दिनाच्या निमित्ताने अखंड नामजप पारायण आणि श्रीदत्त जयंती उत्सवाच्या आयोजन केले आहे. नेरळ गावातील बहुसंख्य भक्त या मंदिरात दर्शनासाठी एकत्र येत असतात.

चिंचआळीमधील ग्रामस्थांनी १९९१ मध्ये मंदिर उभारण्याचा संकल्प केला. त्यानंतर ग्रामस्थांनी तसेच नेरळ गावातील ग्रामस्थांनी लोकसहभागातून



### ■ १९९१ मध्ये मंदिर उभारण्याचा संकल्प

जमीन देण्यापासून बांधकाम साहित्यांची मदत केली आणि श्रीगुरुदत्त मंदिराची उभारणी झाली.

मंदिराच्या उभारणीपासून येथे श्रीदत्त जयंतीचा सोहळा सुरु असून श्रीदत्त जयंतीनिमित्त नेरळ गावातील बहुसंख्य भक्त या सोहळ्याला हजेरी लावत असतात आणि भंडाऱ्याचा लाभ घेतात.

श्रीदत्त जयंती आणि मंदिराचा वर्धापन दिनाच्या निमित्ताने श्री गुरुदत्त मंडळ यांच्या वतीने अखंड ज्ञानयद्न्य सोहळा आयोजित केला जा-तो. त्यासाठी मंडळाचे शहार्ड गवळी, कचरू बदे, धोंडू तरे, आणि अनेक ज्येष्ठांचा सहभाग राहिला आहे. यावर्षी नरेंद्र हजारे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारणी कार्यक्रमाचे आयोजित करीत असून त्यांना दिनकर बदे, दिनेश हजारे, जगदीश चव्हाण, मारुती बदे, अशोक गवळी, मंगेश कदम, संजय बदे, नितीन ससाणे यांचे साथ मिळत आहे.

## मुरुडमध्ये तीन दिवसांची यात्रा

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुडमधील श्री दत्तमंदिर सुमारे ३०० वर्षापूर्वी उंच डोंगरावर वसलेले आहे. असंख्य भाविक या मंदिरात दर्शनासाठी येत असतात. जागृत देवस्थान म्हणून या दत्तमंदिराकडे पहिले जाते. गुरुवार (दि.४) डिसेंबर रोजी श्री दत्तजयंती यात्रा उत्सव सुरु होत आहे. या निमित्ताने व्यवस्थापन कमिटीतर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार (दि.४) डिसेंबर रोजी सायंकाळी दत्तात्रेय उपाध्ये यांचे कीर्तन, महेश सुर्वे यांचे भजन होणार आहे. शुक्रवार (दि.५) डिसेंबर रोजी खरआंबोळी



ग्रामस्थ यांचे कीर्तन होणार आहे. रात्री आठ वाजता हरिपाठ होणार आहे. रात्री ९ ३० वाजता नांदगाव येथील विद्याधर चोरघे यांचे भजन होणार आहे. शुक्रवार (दि.५) डिसेंबर रोजी रात्री आठ वाजता भजन व पहाटे काकड आरती होणार आहे. शुक्रवार (दि.५) डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता किल्लाबांधणी स्पर्धेचे पारितोषिक वितरण कार्यक्रम होणार आहेत.

## रखडलेला रस्ता अखेर मार्गी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर, सेक्टर १० मधील ज्वेल हाईट इमारतीसमोरील सुमारे १०० ते १५० मीटरचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून डांबरीकरणाविना रखडलेला होता. परिणामी येथील रहिवासी मोठ्या गैरसोयीला सामोरे जात होते.

रविवार, (दि.३०) नोव्हेंबर रोजी ज्वेल हाईट्स सोसायटीचे चेअरमन प्रशांत शिंगाडे, अशोक भोसले, विनोद वावरे, देवेंद्र शर्मा, वीरेंदर शर्मा, हिना सिंग यांनी भेट घेत रखडलेल्या रस्त्याच्या प्रश्नाबाबत त्यांनी सविस्तर

### ■ नागरिकांची गैरसोय दूर

माहिती दिली. अडसुळे यांनी तात्काळ पनवेल महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधत संबंधित विभागाला निर्देश दिले. त्यानंतर पुढील तीन दिवसांत रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम प्रत्यक्ष सुरू करण्यात आले. रस्त्याच्या डांबरीकरणामुळे ज्वेल हाईट परिसरातील वाहतूक पूर्वीपेक्षा सुरळीत होण्यास मदत होणार असून रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

## हंगामी फळांची बाजारात आवक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

धार्मिक उपवास-व्रतवैकल्ये, पूजेसाठीची फळे, थंडीतील पोषणासाठीची फळे खरेदीसाठी ग्राहकांची वर्दळ वाढली आहे. त्यामुळे बाजारात १० ते २० टक्क्यांनी भाव कमी झाले आहेत. मार्गशीर्ष महिन्यात उपवास, पूजेसाठी लागणाऱ्या फळांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. किरकोळ बाजारात तर पूजेसाठी लागणाऱ्या पाच फळांचे वाटे तयार करून विकले जातात. त्यामुळे किरकोळ विक्रेत्यांना चांगला नफा मिळत आहे.



बाजारात संत्री, मोसंबी, पेरू, सीताफळ, सफरचंद, कलिंगड अशा फळांसोबतच परदेशी फळांची आवक वाढली आहे. त्याचबरोबर अंजीर, द्राक्ष, बोर, स्ट्रॉबेरी, अमरफळ, चिकू, खरबूज बाजारात उपलब्ध आहेत.

फळांचे प्रकार सध्याचे भाव (प्रतिकिलो) अननस - ४० अंजीर - ५०-६० बोर - ४०-५० चिकू -४०-५०डाळिंब - १५०-२०० ड्रॅगन फ्रूट - ९० कलिंगड - १५-२० केळी - ३०-४० मोसंबी - ५०-६०पपई - १५-२०पेरू - ५५-६० संत्रे - ४०-५० सीताफळ - ५०-६० स्ट्रॉबेरी -३५०-४५० खरबूज - ३५-४५ किलो प्रमाणे आहेत.

## मंगळसूत्र खेचून अज्ञात पसार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पायी घरी जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून अज्ञात त्रिकुट पसार झाल्याची घटना शहरातील अमरधाम परिसरात घडली आहे. ज्योती जानकर (वय ६०) या अमरधाम परिसरातुन पायी जात असताना अज्ञात त्रिकुटाने त्यांच्या गळ्यातील जवळपास ५४ हजार रुपये किमतीचे दोन मंगळसूत्र खेचून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## दिव्यांग मुलांना शालेय फीमध्ये सवलत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गव्हाण येथील शांतादेवी दिव्यांग सामाजिक विकास संस्थेतर्फे बुधवार (दि.३) जागतिक अपंग दिन साजरा करण्यात आला. दिव्यांगांना सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. दिव्यांगांबाबत नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली आहे, तसेच गव्हाण पंचक्रोशीतील अनेक दिव्यांगांना मी मदतीचा हात दिला आहे असे काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी गव्हाण येथे जागतिक अपंग दिनानिमित्त आयोजित



कार्यक्रमात व्यक्त केले.

याप्रसंगी दिव्यांग पालकांची मुले आमच्या यमुना सामाजिक संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेत आहेत त्यांना फीमध्ये ५० टक्के सवलत दिली जाईल असे त्यांनी सांगितले.

यावेळी दिव्यांगांना दारिद्र्यरेषेखालील रेशनकार्ड, उत्पन्नाचे दाखले घरत आणि मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी अशोक कोळी, सचिन कोळी, जनार्दन कोळी, कांचन कोळी आणि दिव्यांग सभासद मोठ्या सख्येने उपस्थित होते.

## रस्त्यात खचली कचरा गाडी

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

कामोठे वसाहतीमधील रस्त्यावर पालिकेची कचरा उचलणारी गाडी खचल्याची घटना बुधवारी घडली आहे. या प्रकारामुळे वसाहतीमधील रस्त्याच्या करण्यात आलेल्या कामाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात असून, डांबरीकरणाच्या नावावर दर्जाहीन रस्ते बनवण्याचे काम पालिकेकडून करण्यात येत असल्याचा आरोप शेतकरी कामगार पक्षाचे शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांनी केला आहे.

वसाहतीमधील सेक्टर १८ येथील सिल्वर स्टार सोसायटी समोर रस्त्यावर पालिकेची कचरा वाहून नेणारी गाडी खचली. पनवेल पालिकेच्या माध्यमातून कामोठे वसाहतीमधील अंतर्गत रस्त्यांच्या दुरुस्तीचे



आणि डांबरीकरणाचे काम करण्यात आले आहे. पावसाळ्यात रस्त्यावरील डांबर वाहून गेल्याने प्रशासनाच्या कामाबाबत प्रश्न उपस्थित केले जात असतानाच घडलेल्या या प्रकारावर नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

**गुरूवारी भक्तगण बहुसंख्येने दत्त दर्शनास** | **अलिबाग तालुक्यातील सर्वात मोठी यात्रा**

# चौल श्रीदत्तात्रयांचे स्वयंभू देवस्थान

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

**नजिकच्या उत्खननाने चौल-रेवदंडा नव्हे चौल चंपावतीनगरी इतिहास शके ८०० ते १२०० कालावधीत जोडला गेल्याचे स्पष्ट केले. पौराणिक व्दापारयुगात चौल-रेवदंडाचा उल्लेख रेवतीनगर असा लिखित आहे. इतिहासकालात विदेश व्यापारांशी संलग्न असलेल्या चौल चंपावतीनगरीत प्रसिध्द अशी ३६० मंदिरांची नोंद सापडते. चौल रामेश्वर, चौल शितळादेवी, हिंगुळजा देवी, मुखरी गणपती, महालक्ष्मी, चंपावतीदेवी, चौल कुडेश्वर मंदिर, रेवदंडा हरेश्वर मंदिर, रेवदंडा मारूती मंदिर आदी मंदिरे अद्यापी इतिहासाची साक्षीदार आहेत, त्यापैकी चौल भोवाळे येथील पर्वतवासी श्री दत्तात्रयांचे स्वयंभू देवस्थान एक आहे.**

चौल भोवाळे येथील पर्वतवासी श्री दत्तात्रयांचे स्वयंभू देवस्थान संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. येथे दत्त जयंतीच्या पाच दिवसांचे यात्रेला रायगड जिल्ह्यासह



मुंबई, पुणे, ठाणे आदी ठिकाणाहून अंदाजे तीन लाख यात्रेकरू येतात. अलिबाग तालुक्यातील सर्वात मोठी व वर्षातील शेवटची यात्रा दत्त जयंती उत्सहात साजरी होते.

संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द असलेले चौल-भोवाळे येथील पर्वतवासी श्रीदत्तात्रयांचे स्वयंभू देवस्थान फारसे पुरातन नसल्याचे सांगितले जाते. दत्त यात्रे संबंधी पुरातन काळातील उल्लेख सापडत नाही, मात्र, नवनाथाचे सुध्दा येथे वास्तव्य होते असे नवनाथ ग्रंथावरून वाटते. मंदिर पुरातन नसले तरी इतिहासीक निश्चित आहे. कारण आग्रांच्या उत्तरकालीन इतिहासात या दत्तमंदिराचा उल्लेख आढळतो.

पर्वतवासी श्री दत्तात्रयांचे स्वयंभू देवस्थानाची मिळणारी माहिती अतिशय मनोरंजक अशीच आहे. इ.स. १८१० च्या मार्च एप्रिलमध्ये डोंगरावर कोणी एक गोसावी राहत होता. त्यांने तिथे एक मठी बांधली, हा गोवावी दत्ताची भक्ती करीत एक दिवस त्याने दत्ताच्या पादुका पुर्वीच्या जागेवरून काढून त्या आपल्या मठीत आणल्या आणि घगरीखाली पुरून ठेवल्या. पुढे १८३१ मार्च एप्रिलमध्ये एक पाषाणाची दिपमाळा बांधण्यात आली. १८३४ च्या डिसेंबर मध्ये गोविंद वाडकर नावाच्या रेवदंडयाच्या कोळी गृहस्थांने पादुकांच्या भोवताली प्रदक्षिणेची साधी असलेली वाट चुनेगच्चीची केली. तर वर कळस बांधला.१८४३ मध्ये गणेशभट गुजराथी प्रभासकर यांनी भिक्षा मागून पैसे जमविले आणि मठीचा जीर्णोध्दार केलात्र त्यावर कौलारू मंडप बांधला या ठिकाणी एक फिरता बैरागी वस्तीस आला. त्यांने १८५७ च्या नोव्हेंबरमध्ये दत्ताची एक पाषाण मुर्ती आणली आणि तिची जुन्या पादुकांजवळ स्थापना केली.

श्रीदत्तात्रेयाची यात्रा मार्गशिष शुध्द पौणिमेला श्री दत्त जयंतीपासून पाच दिवस रात्रंदिवस यात्रा भरते या यात्रेत अडीच ते तिन लाख लोक सामील होतात. या यात्रेत लाखो रूपयांची उलाढाला होते. या यात्रेचे खास वैशिष्टे म्हणजे तेथे श्री दत्तात्रयांच्या मुर्तीवरून कोंबडी ओंवाळून टाकली जात असे व ती इतर लोक पकडून घेऊन जात असत, मात्र काळाचे ओघात ही प्रथा बंद झाल्याचे ऐकिवात येते.

या शिवाय दर गुरूवारी सुध्दा भक्तगण बहुसंख्येने दत्त दर्शनास येतात. तसेच सहलीला येणारे पर्यटक सुध्दा श्री दत्तात्रयांचे दर्शन घेतात. यात्रेच्या पहिल्या दिवशी या नगरीतील पाठारे क्षत्रिय पाचकळशी समाजापैकी मुंबईत राहणाऱ्या मंडळीनी सुमारे ४० ते ६० वर्षापुर्वी तयार केलेला चांदिचा मुखवटा चौल थेरोंडा येथून पालखीतून वाजतगाजत तो दत्त मंदिरात आणला जातो आणि मुळ दत्तमूर्तीची यथासांग पुजा करून हा मुखवटा मुळ दत्तमुर्तीला लावला जातो.

यात्रेपुर्वी या श्री दत्त मंदिरात सात दिवस सप्ताह चालतो. या सप्ताहात आंदोशी गावापासून रामराज पर्यंत साधारणतः १९ गावे सहभाग घेतात. हा सप्ताह रात्रंदिवस यात्रे दरम्यान सुरू असतो.

मंदिराचे टेकडीकडे जाताना वाटेत अनेक मंदिरे लागतात. मंदिर एकतर नाथापैकी पिंगळा सतीचे देऊळ असावे या देवतेचे नावावरूनच समोरच्या तळयाला भोवाळे हे नाव पडले असावे. तळे संपते ताचे समोर दिसते ते भोवाळे गाव. याच गावाजळव चौलनाका ते वावे या मुख्य रस्तावर डावीकडे जो मार्ग जातो तो दत्त मंदिराकडे. दत्त मंदिराकडे जाण्यासाठी रस्ता आहे वाहनेसुध्दा पायऱ्यांपर्यत जातात. सुरूवातीला दत्तमंदिराकडे जाताना उजवीकडे एक मुरलीधरांचे देऊळ आहे. या धर्मशाळेमध्ये पुर्वी प्राथमिक शाळेचे वर्ग भरायचे मात्र सद्या ही धर्मशाळा पडिक आहे. या टेकडीवरून आजूबाजूच्या सृष्टी सौदर्याचा आस्वाद घेता येतो. तेव्हा माणूस नकळत हात जोडून नतमस्तक होतो.

# ना.शं.पाटील यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**श्रीवर्धन :** गावचे शिक्षक ना.शं. पाटील यांनी सेवा काळात ज्या शाळांवर सेवा केली त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनाच नव्हे तर पालकांना देखील त्यांच्या शिक्षण पद्धतीने प्रभावित केले होते. सेवानिवृत्तीनंतर वयाच्या ८१ वर्षीही विद्यार्थ्यांना ते गणित विषयात मार्गदर्शन करीत आहेत. त्यामुळे ना.शं. पाटील हे शिक्षण क्षेत्रातील तपस्वी आहेत, असे विचार प्रा. एल.बी.पाटील यांनी मांडले. नुकतेच ना.शं. पाटील यांच्या 'पावला पावलांवर घडत गेलो' या पुस्तकाचा प्रकाशना समारंभ पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. तसेच, या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य ग.ह. ठाकूर यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक के.पां. म्हात्रे यांनी केले. तर, देविदास पाटील यांनी कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले.

## तहसिलदार सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात ९/आवक क्र.१२७५/२०२५

श्री. सुरज रविंद्र पवार,रा.भेरव
ता.सुधागड जि.रायगड — वादी

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत वाघोशी
ता. सुधागड.जि रायगड — प्रतिवादी

जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवणेत येते की, श्री सुरज रविंद्र पवार, रा. भेरव ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांचे स्वतःचा जन्म दि.१३/०७/२००२ रोजी मौजे भेरव ता. सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर सुरज रविंद्र पवार यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- ०३/१२/२०२५ — सही/-
(उत्तम कुंभार)
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळिवण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमिन मिळकत ही खाली नमुद केलेल्या विद्यमान मालकांची मालकी हक्काची, ताबे, जमिन मिळकत आमचे अशिल कायमस्वरूपी विकत घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नागांव, ता. सुधागड, जि. रायगड.**

| अनु.क्र. | भुधारकाचे नांव | सर्व्हे नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सुलतान अली अब्दुल लालानी | ५२/१/ब | ०-२२-० | ०.१६ |
| २. | श्री. सुलतान अली अब्दुल लालानी | ५३/५ | ०-१४-०<br>पो.ख.०-०२-० | ०.०६ |
| | | एकुण | ०-१६-० | |
| | | एकुण क्षेत्र | ०-३८-० | |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकती पूर्णतः निर्वेध, निजोखमी, व बोजाविरहित असून विद्यमान मालक सदर मिळकतीचे टायटल पुर्णपणे क्लेअर व मार्केटेबल असल्याचे आमचे अशिलांस खात्रीने सांगतात. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्रीचा करार, फरोक्त, खरेदीखत, साठेकरार, दान, बक्षिसपत्र, गहाण, भाडेपट्टा, कुलमुखत्यारपत्र, दावा, लिज, लिन, चार्ज, जप्ती, पोटगी, वारसा हक्क, ताबाकब्जा, वहीवाट, लिजपेंडन्स, इजमेंटरीहक्क, अटॅचमेंट, इसार/बयाणा, कुळवहिवाट, कोर्टवाद, दरखास्त, वचनचिठ्ठी, भूसंपादन, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांचे हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खालील आमचे पत्त्यावर कागदोपत्री लेखी पुराव्यांसह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. प्रस्तुत मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यामान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल जमिन खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणाचेही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

ठिकाण- पाली/सुधागड.
दिनांक-०३/१२/२०२५.
भुधारकाची स्वाक्षरी
सुलतानआली अब्दुल्ला लालानी

पत्र व्यवहाराचा पत्ता:
**ॲड. हर्षल काशिनाथ पाटील**
पत्ता: ४०१/४०१, ओम साई बिल्डिंग, ४ था मजला,
ता.पनवेल, जि. रायगड. मोबा. ९९३०७६९९५८.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल सुरेखा हेमंत माने रा. सी-००२, साई संसार कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.३०, डीमार्ट मागे, सेक्टर-१०, न्यु पनवेल-४१०२०६. यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे - साळोख त नीड आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-**

| जमीन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| सुदाम मारुती पवाळी | १४/२/ब | ०.१९.७०<br>पोखराबा ०.०१.५०<br>एकुण क्षेत्र ०.२१.२० | ३.१२ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सक्तदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ०४/१२/२०२५

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को. ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे किहिम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक मोनामी विशाल राजन आणि विशाल राजन रा. बि-१०६, भुमी व्हॅली, एन.जी.सनसिटी जवळ, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१ यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. मिळकतीचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व ती विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायमस्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल नियोजित खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

मौजे किहिम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ११०/१४२/१४ (जुना गट नं. किहिम ५०८/५४०/१४) क्षेत्र ४.६८.०० आर.चौरस मिटर आकार ४६ रूपये ८० पैसे ही बिनेशती भुखंड मिळकत तिचेवर स्थित असलेल्या अपूर्ण आर.सी.सी. बांधकामासह संपूर्ण मिळकत.

अलिबाग
तारीख : ४/१२/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १, २, तळमजला,
'श्रुतीसारंग'को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतिचे विद्यमान मालक किसन रामचंद्र पवार यांचेकडून कायम मालकी हक्काने सदर मिळकती पैकी क्षेत्र ००.९३.०० (हे.आर.चौ.मी) विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये /विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - ज्ञानवाडी, तालुका - अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ५२, एकूण क्षेत्र ०३-०६-९० (हे.आर.चौ.मी.) आकार रु.पै.५५.६०पैकी क्षेत्र ०२-५१-९० (हे.आर.चौ.मी)(खाते क्र.२)साठी सदर जाहीर सूचना देण्यात येत आहे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/१२/२०२५

**झुंजारराव आणि कं.करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतिचे विद्यमान मालक सखाराम रामचंद्र पवार यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये / विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - ज्ञानवाडी, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ४८, एकूण क्षेत्र ०१-०७-०० ( हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. २.२५/- धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/१२/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळिवणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे तांबडीवाडी, ता. रोहा, जि. रायगड येथिल**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| सुहासिनी सदानंद नाईक व इतर ५ | १५९ | जिरायत ०-५२-००<br>पो.ख. ००-०८-००<br>एकुण ००-६०-०० | ०.४९ | खालसा |
| | १६०/१ | जिरायत ०-२५-००<br>पो.ख. ००-०८-००<br>एकुण ००-३३-०० | ०.२६ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, अ‍ॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. ०३/१२/२०२५ — सही
**ॲड. पी.जी.दाभाडे**
रा. फ्लॅट नं.४०२, बी-बींग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे हॉस्पिटल जवळ, ता.रोहा,
जि.रायगड पिन नं. ४०२१०९ मोबा नं. ९२७२७१३९५६

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग

RDCC Bank — Let's grow together

### निविदा सूचना

बँकेच्या केंद्र कार्यालय व ५८ शाखांमध्ये असलेल्या फायर एक्स्टींग्वेशर (अग्निशामक उपकरणे) रिफील तसेच काही ठिकाणी नवीन उपकरणे बसविणेचे आहेत. तरी सदर क्षेत्रांतील कामे करणाऱ्या मान्यवर व अनुभवी कंपन्या/प्रोप्रायटर यांचेकडून प्रकार निहाय व दरनिहाय निविदा मागविणेंत येत आहेत.

| अ.नं. | कामाचे नाव व प्रकार |
|---|---|
| | बँकेच्या केंद्र कार्यालय व ५८ शाखांमध्ये असलेल्या फायर एक्स्टींग्वेशर (अग्निशामक उपकरणे) रिफील तसेच काही ठिकाणी नवीन उपकरणे बसविणेचे आहेत. |
| १) | DCP टाईप फायर एक्स्टींग्वेश्वर ५ कि.ग्रॅ. |
| २) | DCP टाईप फायर एक्स्टींग्वेश्वर १० कि.ग्रॅ. |
| ३) | ABC टाईप फायर एक्स्टींग्वेश्वर ५ कि.ग्रॅ. |
| ४) | ABC टाईप फायर एक्स्टींग्वेश्वर ६ कि.ग्रॅ. |
| ५) | ABC टाईप फायर एक्स्टींग्वेश्वर २ कि.ग्रॅ. |
| ६) | ABC टाईप फायर एक्स्टींग्वेश्वर ९ कि.ग्रॅ. |
| ७) | Co2 टाईप फायर एक्स्टींग्वेश्वर ४.५ कि.ग्रॅ. |

वरील कामाच्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक ११-१२-२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर करावयांत. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची, कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधील कोणताही आयटम अगर आयटेमस् कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग — **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
दिनांक :- ०४-१२-२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पैसे.) |
|---|---|---|---|
| टेकाळी ता.अलिबाग | ४७५/२ | ०-२७-१०<br>पो.ख.०-०४-००<br>एकुण ०-३१-१० | २.९३ |

**टीप :** वरील मिळकतीपैकी गणेश प्रभाकर महाले, जान्हवी जयंत साळुंखे, करूणा बालसुब्रहमण्यम केतना यांचे मालकीचे क्षेत्र ०-२३-०५ हे. आर., आकार २.०६ रू. पै. एवढे क्षेत्र हे या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

अलिबाग,
तारीख : ०३/१२/२०२५

सही/-
**ॲड. सचिन दिनकर पाटील**
बी. ए. एल. एल. बी. मुंबई
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९२२६८७२६९०

## अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात.

दिवाणी चौकशी अर्ज नं.१८४/२०२५
नि ८/ड

१) श्रीमती. सविता मिनानाथ पाटील,
वय : ५९ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी,
रा.१२६/एल-३, जॉन डिसुझा हाऊस,
गोल्पादेवी रोड, बांगडीवाला चाळ — अर्जदार नं. १,
वरळी कोळीवाडा, मुंबई ४०० ०३०
२) सौ. नविता तुषार पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा शेती व नोकरी,
रा.१११-डी/१७. लक्ष्मीसदन, १ला मजला, — अर्जदार नं. २
गोल्पादेवी मार्ग, मावळ मराठी
व्यायाम शाळेजवळ, वरळी कॉलनी,
मुंबई ४०० ०३०

विरूद्ध

कुणीही नाही. — सामनेवाला

अर्जदार नं. १ व २ यांनी मयत श्री. मिनानाथ पांडुरंग पाटील यांचे मौजे लोणवर गट नं. ४७ सदरी मालक व भोगवटाधारक म्हणून नमूद असलेली ०-३८-८० आकार ७.४४ रू.पै. क्षेत्रफळाच्या सामायिक मिळकतीवर अर्जदार नं.१ व २ यांचा १/१० इतका हिस्सा असल्याने त्यांचे नाव वारस म्हणून दाखल करण्याबाबत अर्ज दाखल केला आहे व तेच त्यांचे वारस आहेत, असा वारस दाखला मिळणेकरीता या कोर्टात अर्ज दाखल केला आहे

सदर अर्जातील अर्जदार नं. १ व २ यांनी, मयत श्री. मिनानाथ पांडुरंग पाटील यांचे वारस असल्याचा दाखला देण्याबाबत ज्या कुणाची काही हरकत असेल अथवा या संदर्भात कुणास काहीही सांगावयाचे असेल तर त्यांनी या मे. कोर्टात समक्ष अथवा त्यांनी ज्यास या संदर्भात पुर्ण माहीती दिलेली आहे व जे विषयाच्या अनुषंगाने उपस्थितीत होणाऱ्या प्रश्नाची उत्तरे देवू शकतील अशा वकीलांमार्फत अथवा प्रतिनिधीमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३० (तीस) दिवसात हजर राहुन त्यांचे लेखी म्हणणे सादर करावे.

विहीत मुदतीत कुणीही हरकत उपस्थित न केल्यास या कामी पुढील चौकशी करण्यात येवुन अर्जदारांस वर नमुद केल्याप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

माझे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी नोटीस प्रसिद्ध केली. आज तारीख ०३ माहे डिसेंबर सन २०२५ रोजी.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दि.न्या.व.स्तर**

सही/-
**अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर**

## जाहीर नोटीस

दिनांक : ०३/१२/२०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील सर्व्हे नंबर १२७/२/ ई, क्षेत्र ०-२६-८० हे. आर., पो. ख. ०-०१-३० हे. आर., एकुण क्षेत्र ०-२८-१० हे. आर., आकार ४.३७ रू. पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दया मधुकर ढेंबे रा. मु. सट्टेवाडी, रामराज, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०३/१२/२०२५ — **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता -श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल हे खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - चोरावले, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| प्रविण कचेर पाटील | २७ | २३ | ४.४५.०० | ४४ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:-:-फ्लॅट नं.४, पहिला मजला,
ए विंग,गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी,
ता.कर्जत, जि रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक : ०२/१२/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती सुप्रिया सूर्यकांत म्हात्रे, सौ. जागृती प्रशांत भांडे, सौ. काव्या अजय दाभोळकर सर्व रा. ४०४/अे, ०२, निरयोग अपार्टमेंट को.ऑप. हौ. सोसा., घाटकोपर पूर्व, मुंबई ४०० ०७५ यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| | मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | रेवदंडा ता.अलिबाग | १०८ | ०-४९-८०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-५०-८० | ३०.८१ |

या बागायत मिळकतीपैकी श्रीमती सुप्रिया सुर्यकांत म्हात्रे, सौ.जागृती प्रशांत भांडे, सौ. काव्या अजय दाभोळकर यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-१०-२० हे.आर. मिळकती संदर्भात.

| | मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| २. | रेवदंडा ता.अलिबाग | ११०/२ | ०-२२-०० | १३.८१ |

या बागायत मिळकतीपैकी श्रीमती सुप्रिया सुर्यकांत म्हात्रे, सौ.जागृती प्रशांत भांडे, सौ. काव्या अजय दाभोळकर यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-०५-१० हे.आर. मिळकती संदर्भात.

सबब सदरहू बागायत मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू भातशेती मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/१२/२०२५

सही /-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी पुढे नमुद केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक तौफिक अब्दुल सत्तार नागोठणेकर यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरवले असुन त्याबाबत विद्यमान मालक व आमचे आशिलांमध्ये बोलणी चालु आहेत. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे-

| अनु. क्र. | गावाचे नाव | भूमापन क्र.व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोर्लई, ता.मुरूड | ५७/१ | ३३.००.०० | ६६०.०० |
| २ | | ५७/२ | २६.००.०० | ५२०.०० |

सदरहु मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालिल सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकती पूर्णतः निर्वेध व बीनजोखमी आहे असा भरवसा जमिन मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतींबाबत आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०३.१२.२०२५

**श्री. अमित महेश्वर देशमुख**
ॲडव्होकेट आणि नोटरी,
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे सापेले, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्रीम.शारदा आनंद खंडागळे<br>योगेश आनंद गुरव उर्फ खंडागळे | २९ | ५ | ०-१०-९० | १-५० |
| अनिकेत आनंद खंडागळे | १६ | १/ ब | ०-१२-६० | १-८१ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०३/१२/२०२५

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

ऋतुराज-विराटची दमदार शतके | टेम्बा बावुमा-मार्करमचे चोख प्रत्युत्तर

# रायपुरमध्ये आफ्रिकेसमोर ३५९ धावांचे लक्ष्य

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू आहे. या मालिकेतील दुसरा सामना रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवण्यात येत आहे. टॉस गमावणाऱ्या भारतीय संघाने ऋतुराज गायकवाड आणि विराट कोहलीच्या शतकांच्या जोरावर ३५८ धावा केल्या. आता दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी धावा कराव्या लागणार आहेत. या सामन्यात ऋतुराज गायकवाडने १०५ धावा तर विराट कोहलीने १०२ धावांची खेळी केली. दक्षिण आफ्रिकेकडून मार्को जॅनसेनने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या.







आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तर भारताला प्रथम फलंदाजी करावी लागली. भारताची सुरुवात फार चांगली झाली नाही. ४० धावांवर भारताला रोहित शर्माच्या रूपाने पहिला झटका बसला.

रोहितला १४ धावांवर नांद्रे बर्गरने माघारी पाठवले. त्यानंतर तिसऱ्या स्थानावर विराट कोहली मैदानावर आला. रोहितनंतर यशस्वी जैस्वाल देखील झटपट बाद झाला. तो २२ धावांवर मार्को जॅनसेनचा बळी ठरला. त्यानंतर चौथ्या नंबरवर आलेला ऋतुराज गायकवाड आणि विराट कोहली यांनी भारतीय संघाचा डाव सावरला. या दोघांनी १९५ धावांची मोठी भागीदारी रचली आणि भारताच्या धावसंख्येचा पाया रचला.

ऋतुराज आणि विराट या दोघांनी शानदार फलंदाजी करत आपपली अर्धशतके पूर्ण केली. त्यानंतर दोघांनी आक्रमक पवित्रा स्वीकारत दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांवर चांगलाच हल्लाबोल चढवला. या दरम्यान ऋतुराजने ७८ चेंडूत शतक पूर्ण केले. शतकानंतर गायकवाड बाद झाला. ऋतुराजने ५३ चेंडूत १०५ धावा केल्या. या खेळीत त्याने १२ चौकार आणि २ षटकार लागवले. त्याला मार्को जॅनसेनने बाद केले.

ऋतुराजनंतर विराटने देखील पहिल्या सामन्यातील फॉर्म कायम लागोपाठ शतक झळकवले. त्याचे एकदिवसीय स्वरूपातील ५३ वे शतक ठरले.

विराट आपले शतक पूर्ण करून बाद झाला. त्याने ९३ चेंडूत १०२ धावा केल्या. या खेळीत त्याने ७ चौकार आणि २ षटकार लगावले. त्याला एनगिडीने माघारी पाठवले. वॉशिंग्टन सुंदर १ धावा करून बाद झाला. तर कर्णधार केएल राहुल ६६ धावा करून तर रवींद्र जडेजा २४ धावा करून नाबाद राहिले. दक्षिण आफ्रिकेकडून मार्को जॅनसेनने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या. तर नांद्रे बर्गर आणि एनगिडीने प्रत्येकी १ विकेट घेतली.

### आयसीसीच्या क्रमवारीत विराट-रोहित पुढे

विराट कोहली आणि रोहित शर्माच्या वन डे तूनही निवृत्तीच्या चर्चा सुरू असताना, ही दोघं धडाकेबाज कामगिरी करत आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या वन डे सामन्यात विराटने खणखणीत शतक झळकावले, तर रोहितनेही अर्धशतकी खेळी केली. विराटला या शतकाचा खूप मोठा फायदा झाला आहे आणि त्याने आयसीसीच्या ताज्या वन डे क्रमवारीत एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यामुळे रोहितची चिंता मात्र वाढली आहे. विराट वन डे फलंदाजांच्या क्रमवारीत नंबर १ स्थानापासून फक्त ३२ रेटिंग गुणांनी पिछाडीवर आहे. त्याने काही दिवसांपूर्वी ८३ वे आंतरराष्ट्रीय शतक झळकावले होते. त्याच्या १३५ धावांच्या खेळीचा आयसीसी क्रमवारीत फायदा झाला आहे आणि तो पाचव्या क्रमांकावरून चौथ्या स्थानी आला आहे.

## अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशनच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा संपन्न



| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशनच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा (दि.३०) नोव्हेंबर रोजी आरसीएफ कुरुळ येथे संपन्न झाल्या. स्पर्धेचे हे पाचवे वर्ष आहे. या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय ट्रायथोलॉनपटू डॉ. महेंद्र पवार उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. वैभव भगत यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेमध्ये क्रिकेट, टेबल टेनिस, बॅडमिंटन आणि कॅरम अशा मैदानी आणि इनडोअर असे दोन्ही प्रकारचे खेळले गेले होते.

या कार्यक्रमास संस्थेचे सर्व सदस्य व माजी अध्यक्ष डॉ. दोषी, डॉ. संदेश पाटील, डॉ. गणेश गवळी, डॉ. मयूर कल्याणी, डॉ. रवी म्हात्रे, डॉ. आशिष भगत, डॉ. अनघा भगत, डॉ. राजेंद्र मोकल, डॉ. मकरंद आठवले उपस्थित होते.

कार्यक्रम कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. ओंकार पाटील, डॉ. अमेय केळकर, डॉ. अमित बेनकर, डॉ. वैजेश पाटील, डॉ. सनली नाईक, डॉ. निशिकांत ठोंबरे, डॉ भूषण शेळके, डॉ. पल्लवी शेळके, डॉ. आदेश मोकाल, डॉ. समीर धाटावकर, डॉ. अभिराज पाटील, डॉ. रश्मी गंभीर, डॉ. प्रांजली पाटील यांनी खूप मेहनत घेतली होती.

## निवडक

### प्रणवची आयसीएन प्रो शो साठी निवड



**अलिबाग :** गोवा येथे झालेल्या आयसीएन इंडिया बॉडी बिल्डिंग स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथील प्रणव उमेश पुजारी याने वेगवेगळ्या वर्गवारीत नवलौकिक करून २०२६ मध्ये आयसीएनच्या वतीने होणाऱ्या शो साठी पात्रता मिळवली आहे. या त्याचा कामगिरीबद्दल गोंधळपाडा ग्रामस्थ आणि अलिबाग तसेच जिल्ह्यातील बॉडीबिल्डरकडून कौतुक होत आहे. प्रणवने बॉडीबिल्डिंग प्रकारात तिसरा क्रमांक, पुरुष फिजिक प्रकारात चौथा क्रमांक, पुरुष फिटनेस मॉडेल प्रकारात सुवर्णपदक, प्रो क्वालिफिकेशन स्पर्धेत ३० स्पर्धकातून तिरसा येण्याचा मान पटकवला आहे. या त्याच्या कागिरीबद्दल त्याची पुढील वर्षी गोवा येथे होणाऱ्या आयसीएनशो २०२६ साठी निवड झाली आहे. प्रणवने अनेक जिल्हास्तरीय बॉडीबिल्डिंग स्पर्धेत सहभाग घेऊन अनेक बक्षीस पटकवली आहेत.

### वेदक महाविद्यालयात क्रीडा स्पर्धा



**तळा :** वेदक कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयामध्ये दिनांक १ ते ३ डिसेंबर दरम्यान तीन दिवसीय वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालय विकास समितीचे पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्या डॉ. शाहीना मिर्झा, क्रीडा विभाग प्रमुख प्राध्यापक विजय तरटे, सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. यास्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी क्रिकेट, हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन, थाळी फेक, गोळा फेक या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला.हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर नंदकुमार वेदक, संस्थेचे सचिव उन्मेष वेदक आणि महाविद्यालय विकास समितीचे सदस्य द. ग तटकरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

### हँडबॉल स्पर्धेसाठी अलिशाला संधी

**बांदा :** न्यू इंग्लिश स्कूल, मडुरा येथील विद्यार्थिनी अलिशा गावडे हिने विभागीय शालेय हँडबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. तिची बदलापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय हँडबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून राज्यस्तरावर स्थान मिळवणारी अलिशा ही एकमेव मुलगी ठरली आहे. विभागस्तर खेळाडू निवड चाचणीत अलिशाने प्रभावी कौशल्य सादर केले. तिला क्रीडा शिक्षक महेश नाईक, लवू बांदेकर यांचे मार्गदर्शन लाभले. धी बांदा नवभारत शिक्षण प्रसारक मंडळ, मुंबईचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, पदाधिकारी, मुख्याध्यापिका सायली परब यांनी तिचे अभिनंदन केले.

### ॲथलेटिक स्पर्धेत ठाण्याला चार पदके

**ठाणे :** हरियाणा येथे नुकत्याच ६९ वी राष्ट्रीय शालेय ॲथलेटिक अजिंक्यपद स्पर्दा पार पडली. या स्पर्धेत ठाण्याच्या टीएमसीएपीवाय खेळाडूंनी दोन सुवर्ण आणि दोन रौप्यपदके जिंकली. या स्पर्धेच्या १९ वर्षांखालील मुलांसाठी (मुले आणि मुली) श्रेष्ठा शेट्टी हिने लांब उडीमध्ये ५.६९ मीटर उडी आणि ४ बाय १०० मीटर रिलेसह सुवर्णपदक जिंकले. गिरिक बंगेरा याने ४०० मीटरमध्ये ४८.२० सेकंद अशी कामगिरी करत आणि ४ ४०० मीटर रिलेमध्ये रौप्यपदक जिंकले. टीएमसीएपीवाय योजना प्रमुख मीनल पलांडे आणि अशोक आहेर यांनी प्रशिक्षक नीलेश पाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली कामगिरी करणाऱ्या सर्व खेळाडूंना आणि त्यांच्या पालकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे सोळा वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेला शुभारंभ

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर सोळा वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला शुभारंभ करण्यात आला आहे.रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यातील एकूण २८ क्रिकेट अकॅडमी व क्लबच्या संघानी स्पर्धेत सहभाग घेतला आहे.सदरची स्पर्धा रायगड जिल्ह्यातील पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण,खारघर येथील बी. पी पाटील मैदान, घरत क्रिकेट मैदान, पनवेल येथील फोर्टी प्लस गावदेवी क्रिकेट मैदान टेंभोडे, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण उलवे सह अन्य उपलब्ध होणाऱ्या मैदानांवर खेळवली जाणार असून स्पर्धा प्रथम साखळी व नंतर बाद फेरी नुसार होणार आहे. स्पर्धेत जवळपास ५० एकदिवसीय ४० षटकांच्या सामन्यांचे आयोजन आरडीसीए तर्फे करण्यात येणार आहे. स्पर्धेत खेळाडूंनी केलेल्या कामगिरीच्या आधारा-वर खेळाडूंची निवड रायगड जिल्ह्याच्या संघात होणार असून निवडलेला संघ पुढे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निमंत्रित दोन दिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल.

याआधी आरडीसीएच्या वतीने चौदा व एकोणीस वर्षाखालील मुलांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, तसेच एमसीएतर्फे आयोजित करण्यात आलेल्या चौदा वर्षाखालील आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्ह्याचा संघ सुपर लिग मध्ये पात्र ठरला असल्याने अश्या स्पर्धेच्या माध्यमातून जिल्ह्यातील युवा क्रिकेट खेळाडूंना आपले कौशल्य मैदानावर दाखवण्याची संधी मिळत असल्याने खेळाडू मध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सातत्याने रायगड जिल्ह्यातील युवा गटातील खेळाडूंनी उत्कृष्ठ खेळाची कामगिरी केली असल्याने जिल्ह्यात पुन्हा एकदा लेदर बॉल क्रिकेटसाठी सुगीचे दिवस आले आहेत.

सोळा वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेला रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदिप नाईक, उपाध्यक्ष राजेश पाटील, यशवंत साबळे, संतोष भोईर, सहसचिव जयंत नाईक, बशीर चिचकर, खजिनदार प्रशांत ओक, सदस्य समीर मसूरकर, कौस्तुभ जोशी, प्रदीप खलाटे, ॲड.पंकज पंडित यांच्या सह सर्व क्रिकेट प्रेमींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सुधागड बॅडमिंटन लीग जल्लोषात; अमीर, परेशच्या जोडीला विजेतेपद



| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

पाली क्रीडा संकुल येथे नुकतीच पार पडलेली सुधागड बॅडमिंटन लीग स्पर्धा उत्साह, शिस्त आणि खेळभावनेने भरभरून यशस्वीपणे पार पडली. सुधागड बॅडमिंटन क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा तालुक्यातील बॅडमिंटनप्रेमींसाठी एक पर्वणी ठरली.

स्पर्धेत सुधागड तालुक्यातील नामवंत तसेच होतकरू खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत नोंदवला. उत्कृष्ट फॉर्मात खेळलेल्या अमीर पठाण आणि परेश वडके या जोडीने सर्व प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजेतेपद पटकावले. नितीश देशमुख-चिंतामणी खोडागले जोडीने उपविजेतेपद मिळवले, तर अमोल कांबळे-खानेकर गुरुजी यांनी तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानले. तुषार खोडागले आणि सहकाऱ्यांनी चौथा क्रमांक मिळवला. उपक्रम यशस्वी होण्यासाठी क्लबचे अध्यक्ष विनय मराठे, अमीर पठाण, नितेश देशमुख, परेश वडके, अमोल कांबळे, दीपक फोडे, बाला खैरे, मकरंद खोडागले, चिंतामणी खोडागले, संदेश सोनकर यांनी मोलाची भूमिका बजावली.

## राज्य बेंचप्रेस स्पर्धेत रायगडचे यश







| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

ज्ञानेश्वर महाविद्यालय वडाळा मुंबई येथे राज्यस्तरीय बेंचप्रेस क्लासिक व इक्विप स्पर्धा नुकतीच पार पडली. २८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत झालेल्या स्पर्धेत रायगडच्या पुरुष व महिला खेळाडूंनी १५ सुवर्ण, ९ रौप्य आणि ९ कांस्य अशी एकूण ३३ पदके प्राप्त केली आहेत. तसेच रायगडचा खेळाडू अब्दुल्ला दस्ते हा स्ट्राँग मॅन ऑफ महाराष्ट्र ज्युनियर क्लासिक पुरुष गटात उत्कृष्ट ठरला. तसेच रायगड जिल्ह्याला क्लासिक स्पर्धेत ज्युनियर पुरुष गटाचे सांघिक विजेतेपद प्राप्त झाले.

**सुवर्णपदक प्राप्त खेळाडू**

अद्वैत भोसले महाड, अब्दुल्ला दस्ते महाड, तन्मय पाटील पेण, शंतनु जोशी कर्जत, नितीन शेजवळ खोपोली, दिनेश पवार खोपोली, सचिन देशमुख खोपोली, ऋषिकेश घोसाळकर, खोपोली, हर्षद देशमुख कर्जत, हनुमंत खरात कर्जत, जितेश साजेकर पेण, अमृता भगत, खोपोली, गायत्री बडेकर, कर्जत, अंजली येवले कर्जत.

**रौप्यपदक प्राप्त खेळाडू**

झाहिद काणेकर महाड, मयुरेश म्हात्रे खोपोली, आसिफ सय्यद खोपोली, ऋतिक पोळ खोपोली, नासिर सय्यद खोपोली, राज कडू कर्जत, ऋतिक पोळ खोपोली, वैष्णवी गंगावणे कर्जत, प्रणाली माने खोपोली, आशा घरत पेण.

**कांस्यपदक प्राप्त खेळाडू**

साई पाटील पेण, रौनक जितेकर दापोली पनवेल, सुरज धीमल खोपोली, संदीप सावंत खोपोली, विवेक धाकवल, कर्जत, यश पंगत पेण.

**गतिमंद मुलांची स्पर्धा**

कांस्यपदक प्राप्त खेळाडू

अनुषा बॅनर्जी पनवेल, संगीता पंगत रसायनी-पनवेल वरील खेळाडूतील निवडक खेळाडू हे राष्ट्रीय स्पर्धेत जातील.

## पीएनपीच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



| अलिबाग | प्रतिनिधी |

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीची सायरस पूनावाला स्कूल नागाव शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉजबॉल राज्यस्तरीय स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. न्यू होरायझ स्कूल खांदा कॉलनी पनवेल येथे नुकतीच डॉजबॉल राज्य अजिंक्य पद व निवड चाचणी स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत कुमार गट मुले व मुली असे एकूण १५ शाळांच्या संघांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत सायरस पूनावाला स्कूल नागावची काव्या नरेश नागवेकर, अस्था वरुण बळी, अक्षरा शिवपुत्र हलगेनॉर, आणि नैतिक कमलेश जैन या विद्यार्थ्यांची सोलापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याच्या संघामध्ये निवड झाली आहे, तसेच शाळेतील क्रीडा प्रशिक्षक राकेश म्हात्रे यांची स्पर्धे साठी पंच म्हणून निवड करण्यात आली आहे.

या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका गीतिका भूचर, लेखापाल अंकित भानुशाली, क्रिडा प्रशिक्षक राकेश म्हात्रे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

## राष्ट्रीय संघ निवडीसाठी चुरस

| अहिल्यानगर | प्रतिनिधी |

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या व अहिल्यानगर जिल्हा खो-खो संघटना यांच्या मान्यतेने अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले युवा प्रतिष्ठाण, विश्वंभरा प्रतिष्ठाण बुऱ्हाणनगर व बाणेश्वर क्रीडा मंडळ बुऱ्हाणनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचा थरार गुरुवार (दि.४ डिसेंबर) श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर येथील मैदानावर ४ ते ७ डिसेंबर दरम्यान रंगणार आहे. संपूर्ण शहरात खो-खो क्रीडा वातावरणाचा उत्साह ओसंडून वाहू लागला आहे.



या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे महाराष्ट्र संघाची निवड कर्नाटक येथे होणाऱ्या ४४ व्या कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी होणार आहे. प्रत्येक जिल्हा पूर्ण क्षमतेने मैदानात उतरणार आहे.

राज्यातील २४ जिल्ह्यांतील तब्बल ८७० खेळाडू व प्रशिक्षक सहभागी होणार असून चार मैदानांवर सामने रंगणार आहेत. सर्व यंत्रणा, व्यवस्था, निवास, भोजन, वैद्यकीय सुविधा आणि मैदानाची तयारी पूर्ण झाल्याचे संयोजकांनी सांगितले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन सायंकाळी ६ वाजता झाले. याप्रसंगी अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले महिल्यानगर (दक्षिण) संचालक-जिल्हा सहकारी बँक, राधाकृष्ण विखे पाटील, संग्रामभैय्या जगताप, पंकज आशिया, जिल्हाधिकारी, सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक अहिल्यानगर, आदी मान्यवरांच्या उपस्थित होते. त्यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार, डॉ. चंद्रजित जाधव, सचिन गोडबोले, ॲड. गोविंद शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

'खो-खो'च्या वेग, चपळाई आणि रणनीतीने सजलेल्या या रोमांचक स्पर्धेत कोण ठरणार अजिंक्य? कोण मिळवणार महाराष्ट्राचा मान आणि राष्ट्रीय स्पर्धेची तिकीट? हे पाहण्यासाठी क्रीडाप्रेमींची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.





कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)